# डॉ. नितीन मोरे

# ऐसा~~भी~~ही होता है



# ऐसा ही होता है!

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# ऐसा ही होता है!

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ऐसा ही होता है!

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ९ मार्च २०२०


©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे यांची ईसाहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,(विनोद)
4. नाच जमूरे नाच,(विनोद)
5. अहम ब्रह्मास्मि, (विनोद)
6. मच्छर टाईम्स, (विनोद)
7. संवादोनी प्रकटावे (विनोद)
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास (पत्रे)
12. ~~शि~~भ्रष्टाचार! (विनोद)
13. आधुनिक कहाण्या (विनोद)
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार (नाटक)
15. राग दरबारी (एकांकिका )
16. वाळूतल्या रेघा (विनोद)
17. संधी साधू (नाटक )
18. न.बा.च्या (प्रेम) कविता (कविता)
19. व्यक्ती आणि कथा - ठेंग्यादादा.. पेद्रू.. अँड्र्यू इ.
20. प्रीतीची ’प्रेम’कथा (कादंबरी)
21. ऐसा ही होता है!






## ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर विनामूल्य उपलब्ध आहेत.

www.esahity.com

## डॉ. नितीन मोरे यांच्या पुस्तकांच्या लिंक्स

नाटके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ragdarabari_nitinmore.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sangato_aika_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramadityacha_darbar__nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramaditya_2_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prematuranam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ya_kolhatakaranchya_gharat_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sandhisaadhoo_nitin_more.pdf

विनोदी साहित्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/adhunik_kahanya_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/valutil_regha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bhrashtachar_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/machchhar_times_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/nach_jamure_nach_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aham_brahmasmi_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kelyane_shirshasan_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/samvadoni_prakatave_nitin_more.pdf

इतर

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/letters_nitin_more.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/na_ba_kavita_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vyaktikatha_nitin_more.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/covpreetichiprem.jpg


राग दरबारी
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अहम् ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच


डॉ. नितीन मोरे
वाळूतील रेघा


डॉ. नितीन मोरे
न.वा.च्या (प्रेम) कविता




डॉ. नितीन मोरे
संधी साधू






डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या


डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार


डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,

डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां

डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार

डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स

डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात

डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२

डॉ. नितीन मोरे
संवादांनी
प्रकटावे

डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका

डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

# अर्पणपत्रिका

सर्व क्षेत्रांतील नेतागणांस

सभयपुर्वक अर्पण

डॉ. नितीन मोरे

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे एकविसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# एकविसाव्या पुस्तकाच्या निमित्ताने ..

अमृताते पैजा जिंकणारी आपली माय मराठी.. तिची सरकार दरबारी उपेक्षा ही आता नवीन बाब राहिली नाही. पण भाषा जगते नि तगते ती सर्वसामान्यांच्या वापरामुळे. ई साहित्य हे काम 'नेटा'ने करत आहे आणि ही भाषेच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाची बाब आहे.

एकूणच पुस्तक व्यवहार हा नव्या लेखकाच्या दृष्टीने एक कठीण भाग असतो. लिहिणे कदाचित सोपे पण ते प्रसिद्ध करून वाचकाच्या हाती ते पोहोचवणे कठीण असा अनुभव सगळयाच होतकरूंना आलेला असणार. हे एखाद्या नोकरी शोधणाऱ्या तरूणासारखे आहे.. अनुभव नाही म्हणून नोकरी नाही नि ती नाही म्हणून अनुभव नाही! प्रथितयश प्रकाशन संस्था नवीन पुस्तकांकडे कुठल्याही कारणाने का होईना कानाडोळा करत असताना अशा लेखकांनी आपले लिखाण कसे प्रसिद्ध करावे? ई साहित्यने हा प्रश्न सोडवला आहे.

पुस्तक प्रकाशन हा महागडा उद्योग आहे. त्यात परत प्रकाशकांचा अपारदर्शक व्यवहार (अर्थातच काही सन्माननीय अपवाद ) .. कागद, छपाई, वितरण, विक्री आणि त्या सगळयांचे हिशेब या सगळयांना फाटा देत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करत ई पुस्तके प्रकाशित करणे ही भाषा व्यवहाराच्या दृष्टीने एक महत्त्वाची बाब आहे. आणि त्याबद्दल ई साहित्य टीमचे अभिनंदन करायलाच हवे. त्यामुळे कित्येक नव्या लेखकांना वाचकांसमोर येण्यास मदत झाली आहे.

माझी शाळा म्हणजे गोरेगावची अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल. शाळेने आम्हाला घडवले हे खरे. दामोदर सामंत सर आम्हांला मराठी शिकवत. त्यांच्या मराठीच्या वर्गामुळेच भाषेचे सौंदर्य समजत गेले. भाषा महत्त्वाची खरीच. तिच्यामुळेच संवाद साधला जातो नि तिच्यामुळेच विसंवाद ही होऊ शकतो. दैनंदिन जीवनातही भाषा सर्व काही व्यापून असते. तीच

भाषा जेव्हा लिखाणात वापरली जाते तेव्हा तिच्या सौंदर्याची भुरळ साहित्य वाचनात पडत राहतेच. मेडिकलच्या पुढील शिक्षणात भाषा एक विषय म्हणून मागे पडला. शास्त्रीय शिक्षणात भाषेचे काम विशेष नसले तरी भाषेचा उपयोग होतोच सगळीकडे. अगदी पेशंट्सच्या हिस्टरी टेकिंगसाठीही. भाषा वेगवेगळ्या पद्धतीने बोलत पेशंट्सकडून माहिती काढणे हे कठीण काम. खरेतर सर्वात कठीण मेडिकल शिक्षणात काही असेल तर हे हिस्टरी टेकिंग. विविध शैक्षणिक पातळीवरील रूग्ण, त्यांची बोलण्याची नि आपले सिम्पट्म्स सांगण्याची पद्धत वेगळी. त्यातून हवी ती माहिती काढून घेणे हे खरे कौशल्याचे काम. येथे भाषेचे बारकावे उपयोगी पडतात. अर्थात साहित्यिक भाषेची गरज नसते त्यासाठी पण संवाद साधला जाणे महत्त्वाचे.

लिखाणाची आवड मला अगदी लहानपणापासूनची. शाळेत भित्तीपत्रके असायची त्यात काही ना काही लिहिलेले आठवते अजूनही. कॉलेजात मराठी वाङमय मंडळाच्या बोर्डावरही मध्ये मध्ये लिखाण चाले. खरेतर वाचनाची प्रचंड हौस होती शाळेत असताना. मे महिन्याच्या सुट्टीत दर दिवशी एक या प्रमाणे पुस्तके वाचल्याची आठवतात मला. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात तशी हजारो पुस्तके असल्याने ती उपलब्धही व्हायची सहज. त्या वाचनात कादंबऱ्या, कथा, चरित्रे, आत्मचरित्रे, ऐतिहासिक पुस्तके असे सारे काही असायचे. वाचून तसे काहीतरी लिहायचा प्रयत्न व्हायचा. आणि त्या शाळकरी वयात काहीतरी मोठेपणाचा आव आणत गंभीर काही लिहायचा प्रयत्न व्हायचा. मला वाटते नववीत असताना असेल.. गदिमा गेले नि शाळेत त्यांच्यावर निबंध लिहायला सांगितलेला बाईंनी. तो एकेकाने वाचायचा सगळयांसमोर. मला आठवतेय, भारी भारी नि कठीण शब्द निवडून लिहिलेला तो निबंध मी. अजून आठवते मला, तो वाचला मी आणि शेवटी माझ्याच लक्षात आले, भाषेचे सौंदर्य तिच्यातल्या कठीण शब्दांत नि वाक्यांत नाही, क्लिष्टपणात तर नाहीच नाही, तर साध्या, सोप्या आणि त्या त्या ठिकाणी बसू शकणाऱ्या चपखल शब्दांत आहे. पुढेही काहीही लिहित असे मी. एका कुठल्याशा क्षणी वीस तीस कवितांचा संग्रह लिहून काढलेला ही आठवतोय. 'मृत्युंजय' वाचल्यावर त्या धर्तीवर चक्क कादंबरी

लिहायला घेतलेली त्या वयात! दोन तीन पानानंतर तो उत्साह मावळला हे खरे.. हे सारे लिखाण पुढे रद्दीत जायचे तसे गेलेच. पण लिहिण्याची 'ऊर्मी' टिकून राहिली .. ऊर्मी म्हटले की कसे भारी वाटते म्हणून तो शब्द, नाहीतर खरेतर लिहिण्याची हौसच म्हणायला हवे!

आधी आधी लिहायचो त्याचे विषय नक्की आठवत नाहीत, पण ते नक्कीच काहीतरी गंभीर भाषेत असायचे. पुढे डॉक्टरकीच्या प्रॅक्टिसमध्ये पंधरा एक वर्षे लिहिणे वगैरे बंदच होते. मेडिकलच्या चरकात पिळून घेताना असे काही सुचणे अशक्यच हे ज्याने असे शिक्षण घेतले त्यास नक्कीच पटावे. पण लिहिण्याची सुप्त इच्छा कदाचित मनात निद्रिस्त असावी. साधारण आठेक वर्षे झाली असतील वसईतल्या प्रॅक्टिसला आणि त्या इच्छेला जाग आली अचानक.. एके दिवशी अचानक सकाळी एक कथा सुचली. रात्री बसून ती लिहून काढली. आणि कौतुकाने स्वतःच वाचून काढली. कालपर्यंत जगात नसलेली पात्रे निर्माण केल्याचा आनंद होता म्हणा किंवा स्वकौतुक वाटत होते म्हणा. आजही ती कथा माझ्याकडे तशीच आहे पडून. आता वाचताना ती अर्धकच्ची असल्याचे जाणवते .. जुन्या साडीचा ड्रेस शिवावा तसे या गोष्टीला नुकतेच एकांकिकेचे स्वरूप दिले आहे मी! ही गोष्ट विनोदी होती. आणि यापुढे विनोदीच लिहावे.. गंभीर लिहावे तर तेही विनोदाच्याच प्रकारात अशा पद्धतीने लिखाण सुरू झाले. ते २००५ चे वर्ष होते. हळूहळू लिहिलेले गोळा होत गेले. 'वाचकाच्या शोधात एक लेखक' या उपर प्रगती नव्हतीच. लिहिलेले पेपर सांभाळणे एक मोठे काम होऊन बसले. पुढे लॅपटॉपवर लिहिणे सुरू झाल्याने ते एक काम सोपे झाले. पण साचणाऱ्या लेखांचे करायचे तरी काय? काही गोष्टी लिहिल्या. दिवाळी अंकांना पाठवल्या. बहुतेकांनी त्या छापल्या नाहीतच. कुणी छापल्या त्यांनी तो अंक देखील कधी पाठवला नाही. त्यामुळे बिन माहितीतल्या अंकांना गोष्ट पाठवणेच बंद केले मी. झाले इतकेच की प्रकाशनाच्या प्रतिक्षेची रांग वाढत चालली. त्यातल्या त्यात लॅपटॉपमुळे कागदाची रद्दी जमत नव्हती इतकेच समाधान! पुढे वसईच्याच दोन दिवाळी अंकांत कथा येऊ लागल्या. आणि एके दिवशी ई साहित्यचा शोध लागला.

लिखाण हा एक माझ्यासाठी विरंगुळा आहे, छंद आहे. एखादी गोष्ट लिहून हातावेगळी झाली की पुढे काही दिवस हुरहुर लागून राहते. नवीन काही सुचले तर ठीक नाहीतर उदासीनता यायला लागते. लक्षणे ही ठीक नाहीत हे खरे, पण गेल्या काही वर्षात तरी न सुचल्याचे दिवस आले नाहीत. आशा आहे, पुढेही न येवोत. लिहिण्याचा हा स्वांत सुखाय उपक्रम म्हणा की उपद्व्याप म्हणा ई साहित्य कृपेने सर्वांपर्यंत पोहोचतोय नि कुणी वाचक मिळेल का वाचक अशी याचना करत फिरावे लागत नाही यातच आनंद आहे!

आधीचेच लिहिलेले माझ्याकडे खूप काही होते. पहिले पुस्तक चक्रमादित्याचा दरबार प्रसिद्ध झाले. पाठोपाठ अजूनही पुस्तके आली. प्रसिद्ध होताहेत म्हटल्यावर लिहिण्याचा उत्साह अजून वाढला. त्यातून एकांकिका नि नाटके लिहून झाली. अगदी कादंबरीही झाली.

ई साहित्य असे लिखाण प्रसिद्ध करतेय, तेही सुंदर रीतीने आणि कलात्मक मुखपृष्ठासहित. आणि ते पुस्तक जगभरात कुठेही पोहोचते क्षणार्धात. यापेक्षा लिहिणाऱ्याला काय हवे असणार?

ई साहित्यने मराठी भाषेचा झेंडा साता समुद्रापार रोवलेला आहेच. तो झेंडा आणि त्याहूनही महत्त्वाचा मायमराठी भाषेचा झेंडा असाच डौलाने फडकत राहो हीच इच्छा.

डॉ. नितीन मोरे

# ऐसा ही होता है!

## ऐसा ही होता है!

अनुक्रमणिका


१. लोकशाई!

२. भन्नाट भानूचा जाहीरनामा

३. मस्त चाललंय आमचं!

४. सारं कसं शांत शांत!

५. सभात्याग : एक करणे.

६. लोकपाल टोपीची गोष्ट

७. सत्यदेवाचे मंदिर

८. मंत्रालयातील साक्षात्कारी आग

९. त्यांच्या आध्यात्मिक गप्पा

१०. एक अर्ज : अ.वि. साहित्य संमेलनासाठी

११. मुरलीतनय लाळघोटेंचे भाषण

१२. एका आत्मचरित्राची कथा

१३. ऐसा भी होता है.. नाही, ऐसा ही होता है!

**ऐसा ही होता है!**

प्रस्तावना

शब्दश: अकरा शब्द!

उपरोध मीच केला म्हणून शिक्षा कपाळी मिळत नाही तोवर लिहित राहायचे!

डॉ. नितीन मोरे.

## लोकशाई!

"लोकशाही म्हणजे काय रे भाऊ?"

"रे, लोकांचे राज्य असते ना त्याला लोकशाही म्हणतात.."

"म्हणजे तुझं आणि माझं राज्य का रे भाऊ?"

"छे! तुला इतकं कसं रे नाही समजत, तू आणि मी काय लोकं आहोत?'

"मग लोकं म्हणजे कोण रे भाऊ?"

"अरे,तू आणि मी सोडून सगळे लोकं असतात.."

"म्हणजे तो तिकडे पडलाय तो गण्या का रे भाऊ?"

"रे, गण्या शुद्धीवर असेल तर लोक नाहीतर तो पण लोक नाही रे गड्या."

"पण भाऊ, गण्या कधी शुद्धीत असतो? मग तो लोक कधी बनणार भाऊ?"

'अरे, तो शुद्धीत आला तर त्याला बरे वाईट कळून वाईट वाटेल म्हणून त्याला असाच बेशुद्धीत ठेवतात.."

"पण भाऊ बेशुद्ध म्हणजे रे काय?"

"रे, आजूबाजूला सगळे काय करतात हे न समजणे म्हणजे बेशुद्धी."

"बेशुद्धी म्हणजे झोप का रे भाऊ?"

"रे, झोप म्हणजे बेशुद्धी नव्हे गड्या. झोपलेला लवकर उठतो. बेशुद्ध उठायला वेळ लागतो."

"बेशुद्ध म्हणजे मेलेला का रे भाऊ?"

"रे, मेलेला कसा असेल? मेला तर लोकशाही कशी चालेल?"

"म्हणजे लोक चालवतात ती लोकशाही.."

"रे, खास लोक चालवतात ती खास लोकशाही."

"पण मग बेशुद्ध होऊन कशी रे चालते ती भाऊ?"

"रे, त्याला पाच वर्षांनी शुद्धीवर आणायचं इंजेक्शन देतात."

"इंजेक्शन म्हणजे दुखत असणार ना भाऊ?"

"रे, इंजेक्शन आजार बरा करण्यासाठी देतात ना? तसा या लोकांना आजार बरा करण्यासाठी इंजेक्शन देतात."

"पण आजार कुठला असतो भाऊ?"

"अरे, शुद्धीवर आल्यावर विचार करायला लागतात लोकं, तोच त्यांचा आजार."

"पण मग त्याला बेशुद्धच का नाही ठेवत रे भाऊ?"

"अरे, तो बेशुद्ध राहिला तर लोकशाही चालणार कशी?"

"म्हणजे रे काय भाऊ?"

"रे, लोकशाही चालायची तर मतदान करावे लागते. ते करायचे तर गणाला तिकडे जावे लागेल. तिकडे जायचे तर तो तिथे जाईपर्यंत तरी शुद्धीत असायला हवा की नाही?"

"पण भाऊ, मद्दान म्हणजे रे काय?"

"रे, त्या शाळेत जाऊन लाईन लावणे म्हणजे मतदान."

"म्हणजे शाळेतली प्रार्थना का रे भाऊ?"

"छे, तुला तर काहीच ठाऊक दिसत नाही. मतदान म्हणजे पवित्र कर्तव्य."

"म्हणजे पूजा का रे भाऊ?"

"छे, रे, मतदान म्हणजे बटन दाबणे. यंत्राचे."

"म्हणजे वॉशिंग मशीन कारे भाऊ?"

"रे, तू हुशार आहेस. अरे, कुणाची धुलाई करणे, कुणाला साफ पाडणे, तर कुणाला साफ करणे म्हणजे रे मतदान."

"पण तरीही मद्दान म्हणजे काय रे भाऊ?"

"रे, मतदान म्हणजे लाईन लावून बोटाला शाई लावणे."

"मग लोकशाही म्हणजे लोकशाई का रे भाऊ?"

"रे, आता कसे बोललास? बोटाला शाई लावणे म्हणजेच लोकशाई.. नव्हे लोकशाही."

# भन्नाट भानूचा जाहीरनामा!

भन्नाट भानू कोणाचेच ऐकत नाही कधी. उगाच कुणाचे ऐकून गप्प बसायला तो काही असातसा नाही. चांगला भन्नाट भानू आहे तो. भानू भन्नाट असल्याने त्याची मतेही भन्नाट आहेत. म्हणजे मतं फुटतात ना माणसाला तेव्हापासूनच ती भन्नाट आहेत. पुढे त्या मतांची मुळं खतपाणी घालून अजून खोलवर रूजवलीत त्याने. त्यामुळे त्याच्या मतांच्या विशाल वटवृक्षाला आता पारंब्या फुटायला आल्यात! आणि त्याच पारंब्यांना लोंबकळत तो वैचारिक झोके घेत असतो.

राजकारण म्हणजे भानूचे कुरण. चरते कुरण म्हणा. त्यात निवडणुकांचा हंगाम म्हणजे सुगीचे दिवस त्याच्यासाठी. त्या काळात त्याला कावळयाच्या छत्र्यांसारखी अल्पजीवी मतं फुटतात. कुणी तेरड्याची झाडं पण म्हणू शकेल त्याला. काही दिवसांत ती मतं बाजूस सारून तो दैनंदिन कामाला लागतो. मतदार राजा तो. त्याचे राज्य औट घटकेचेच असायचे. एकदा मत पेटीत पडले की पाच वर्षांसाठी या राजाचे राज्य खालसा. मग पुढच्या पाच वर्षांनी नव्याने नवी विटी नवे राज्य सुरू होते. मतदार राजा आपले राज्य काही दिवसांसाठी परत उपभोगायला लागतो. भानू तर सजग मतदार. आजवर त्याने एकदाही मतदान चुकवलेले नाही. एकदा तर फक्त मतदान करण्यासाठी म्हणून तो आपल्या राजापुरातून एक दिवसासाठी येऊन परत गेलेला मे महिन्याच्या सुटीत. असा लोकशाहीतील पवित्र कर्तव्याची जाण असणारा सुजाण, सजग, जागरूक नागरिक विरळाच.

अशा या भानूला एके दिवशी जाहीरनामा फुटला.. कुणाला सर्दी व्हावी किंवा एखादीला मूल व्हावे तसा त्याला जाहीरनामा झाला!

झाले हेच..

हंगाम निवडणुकांचा. मान्यवर नेते पायास भिंगरी लावून आपणच किती योग्य किंवा खरेतर बाकी किती अयोग्य हे पटवत फिरताहेत देशभर. देशाचे आकाश झाकोळून टाकत त्या हेलिकॉप्टरने फिरणाऱ्या नेत्यांना आकाशी ईदका चांद किंवा खरेतर धुमकेतू पहावा तसे डोळे भरून पाहून घेताहेत. नेते आश्वासनांची खिरापत वाटत फिरताहेत. त्या आश्वासनांच्या जोरावर मतदार राजा पुढच्या पाच वर्षांच्या स्वप्नांची बेगमी करून ठेवतोय.. एखाद्या गृहिणीने वर्षभराचे वाळवण करून ठेवावे तसे.

तर दिवस निवडणुकीचे. भन्नाट भानू रात्री अशीच स्वप्ने पाहात झोपलेला. तो दचकून उठला भर रात्री. एखाद्या शीघ्रकवीला कविता स्फुरावी नि त्या कवितेचे शब्द प्रपात कवीला न जुमानता कोसळू लागावेत तसा तो जाहीरनामा भानूच्या तोंडून बाहेर पडला. जाहीरनामा म्हणावे की जाहीर भाषण म्हणावे त्याला? जे काही असेल ते असो. भन्नाट भानू आपल्या तोंडून येणाऱ्या शब्दांना जाहीरनामाच समजतो.. तसे तोच म्हणालाय त्याच्या भाषणात.. वाचा त्याच्याच शब्दांत..

"माझ्या प्रिय बंधू आणि भगिनींनो,

आज मी इथे उभा आहे ते मतदाराचा जाहीरनामा जाहीर करण्यासाठी. तसा मी कुणीच नाही आणि लोकशाहीत तसे म्हटले तर सर्व काही आहे. पण आज माझ्या स्वप्नात स्वातंत्र्य देवी आली. भारतमातेचे दुसरे रूप असावे अशी स्वातंत्र्य देवी मला म्हणाली, उठ आणि मी सांगते ते

साऱ्या जगास ओरडून सांग. देवीचीच आज्ञा ती. मोडणार कशी? तेव्हा ते सांगावेच लागेल मला. तर ऐका..

वुई द पीपल ने सुरू होणारे संविधान आपले. त्याचे पालन हे आपलेच कर्तव्य आहे. त्या संविधानाने काही हक्क दिले आहेत. नि त्या हक्काच्या नाण्याची दुसरी बाजू म्हणजे कर्तव्येही सांगितली आहेत. या मतदार जाहीरनाम्यातून मी स्वातंत्र्य देवीने सांगितलेली मतदाराची मूलभूत कर्तव्ये आपणा सर्वांना सांगत आहे. नीट कान देऊन ऐका, नुसती ऐकू नका तर पचवा आणि जिरवा .. तर.. घ्या सर्वांनी प्रतिज्ञा..

येत्या पाच वर्षांत मी गीतेत सांगितलेल्या कर्मयोगाचे काटेकोरपणे आचरण करीन.

मतदानाचे कर्म करून मी निवडलेल्या कुणी नंतर कुणाशी युती वा आघाडी केली तरी मी एक शब्दही उच्चारणार नाही.

एकदा धनुष्यातून बाण निघून गेल्यावर तो परत आणता येत नाही त्याप्रमाणे एकदा प्रतिनिधी निवडल्यावर माझ्या बुऱ्याभल्याचे सारे हक्क पाच वर्षांसाठी मी निवडून आणलेल्या वा आलेल्या सेवकाकडे सुपूर्द करत आहे याची जाण ठेवीन. माझ्या मतदान कर्माचे फल मला मिळावेच अशी अपेक्षा मी करणार नाही.

मी निवडून दिलेल्या कुणाकडूनही कुठलीही अपेक्षा करणार नाही.

अपेक्षा आणि त्यांचा भंग हे दु:खाचे मूळ आणि कारण आहे याची मी सदैव आठवण ठेवीन.

सुख हे निरपेक्ष कर्म करण्यात असल्याने मतदानाचे कर्म मी निरपेक्षपणेच करीन.

त्यामुळे निवडून आलेल्या कुणाकडून अपेक्षा न ठेवता ठेविले सरकारे तैसेचि रहावे या उक्तीनुसार वागेन.

जनप्रतिनिधी जे जे करेल ते जन इच्छा म्हणून मला मान्य असेल.

किंबहुना जे जे तो करेल त्यासाठी त्या मान्यवरास जबाबदार न धरता त्यास निवडून देणारी जनताच जबाबदार असेल हे मी सदैव ध्यानात ठेवीन.

सदर मान्यवराने सत्तेचा दुरूपयोग केल्याचे आरोप झाल्यास त्याकडे कानाडोळा करणे हे माझे परम कर्तव्य असेल.

कारण या सर्वांस तो निमित्तमात्र आहे आणि कर्ता करविता त्यास निवडून देणारा मतदारच असेल हे मी सदैव ध्यानात ठेवीन.

सदर आरोप करणारे लोकशाहीशी द्रोह करीत आहेत हे मी नेहमीच मान्य करीन.

माझ्या देशाच्या निवडून आलेल्या सरकारच्या कुठल्याही निर्णयाबद्दल मी कधीही संशय घेणार नाही.

कारण असा संशय घेणे म्हणजे आपणच निवडलेल्या प्रतिनिधींवर संशय घेणे.

आपल्याच कृतीबद्दल असे मी कधीच करणार नाही.

छोट्यात छोट्या नगरसेवका पासून राज्य आणि राष्ट्र स्तरावरील प्रतिनिधी नेहमीच माझे आदर्श असतील.

त्यांच्या नखाचीही सर मला नाही याची मी सदा जाणीव ठेविन.

देवाला सारी लेकरे सारखी असली तरी काही जास्त समान असतात हे मी सदैव ध्यानात ठेविन.

त्यात स्वतः मी या कोणाच्या बरोबरीचा नसल्याचेही ध्यानात ठेवून त्यांचा उचित सन्मान करीन.

या सगळयांना जनसेवेची ओढ लागल्यामुळेच ते इकडे अवतरले आहेत हे ही मी कदापि विसरणार नाही

निवडणूक काळातील सभांना मी न चुकता हजेरी लावून पुढाऱ्यांची गर्दी न जमण्याची काळजी दूर करण्याचा प्रयत्न करीन.

भाषण सुरू असताना योग्य ठिकाणी टाळ्या वाजवण्यात कुचराई मी करणार नाही.

सभेत मी स्वखर्चानेच येईन आणि सभेनंतर कुठलीही अपेक्षा न ठेवता मी निघून जाईन.

निवडणुकीतल्या भाषणांना मी कदापि करमणूक कर नसलेले कार्यक्रम समजणार नाही.

निवडणुका संपल्यानंतर त्या काळातील वचने नि आश्वासने यांना मी विसरून जाईन.

ते न विसरता आल्यास विविध निवडणूक जाहीरनामे मी विनोदी साहित्य म्हणून वाचून काढेन.

या आणि याच्या आधीच्याही जाहीरनाम्यांचे मी जाहीर स्मरण मात्र कधीही करणार नाही.

सर्वच नेत्यांचा विविध आश्वासने देण्याचा मूलभूत हक्क आणि विशेष अधिकार मी सदैव मान्य करीन.

त्याच वेळी ही आश्वासने पूर्ण करण्यास पुढील अजून एका निवडणुकीत परत संधी देण्याचेही मी आश्वासन देईन.

मतदार म्हणून दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचे बंधन मात्र माझ्यावर असेल.

सुजाण नि सजग मतदार म्हणून मी जास्त विचार न करता मतदान करीन.

मतदान झाल्यावर पाच वर्षे मी विष्णू भगवानांचा आदर्श ठेऊन शेषशायी होईन.

एकदा मतदान केले की सरकार काय करीत आहे याकडे मी सदैव कानाडोळा करीन.

कुठल्याही निर्णयाची चिकित्सा न करता ते मी भक्तिभावाने मान्य करीन.

देश आणि राज्य स्तरावरील सर्वोच्च नेतृत्वास मी देवासमान मानून त्यांची भक्ती करीन.

त्यांच्या प्रत्येक निर्णयातून सकारात्मक अर्थ शोधून त्याचे समर्थन करीन.

या उलट कोणी वागत असल्यास त्याचा मी निषेध करीन.

एकदा मतदान केले की पुढील पाच वर्षे मी कसलाही बरावाईट विचार न करण्याची शपथ घेईन.

पुढील निवडणुकीत परत राजा म्हणवून घेईतोवर मी माझी जागा पात्रता आणि योग्यता ओळखून पायरी संभाळून राहिन."

एवढे बोलून भन्नाट भानू परत निद्राधीन झाला. भानूची बायको भानुमतीचे डोके हा काही भानामतीचा प्रकार की काय असे वाटून भणभणले. भर रात्रीत साक्षात्कार झाल्यासारखा भानू उठून असले भन्नाट भाषण ठोकतो नि त्याची भानुमती ते झोपेतून उठून ऐकते.. भानूला त्याचा पत्ताच नाही. भाषण संपवून भन्नाट भानू झोपला परत.. स्वातंत्र्य देवीनेच त्यासाठी त्याची निवड केली असावी की काय?

भानुमती झोपेतून उठवत म्हणाली त्याला, "काय हो भर रात्री कसले ठोकताहात भाषण?"

"मी?"

"आणि काय मी? मतदान काय नि लोक प्रतिनिधी काय.. निवडणुकीची भाषणं जास्त ऐकलीत की काय?"

"अगं.. असं म्हणतेस? मग बरं झालं बोलून घेतलं..  रात्रीच! दिवसा मला कोणी बोलू दिले असते? आपण आपलं रात्रीच भाषण ठोकून घ्यायचे!"

म्हटले ना, तो भन्नाट भानू आहे.. अगदी भर रात्री ही कोणाचे ऐकणार नाही तो!

## मस्त चाललंय आमचं!

आमचे तसे बरे चालले आहे म्हणा ना.

बरे म्हणजे तसे चांगलेच चालले आहे. खरंतर छानच चाललेय म्हणा ना. म्हणजे उगाच शब्दांची कंजुषी कशाला. पैपै वाचवायचे धोरण ठीक.. पण वचने किं दरिद्रता? कंजूषपणा तसा सद्गुण म्हणावा. पण असे दात कोरून पोट भरायला ही काय देशाची अर्थव्यवस्था आहे? असो.

तर सांगत काय होतो, आमचे तसे मस्त चाललंय .. काय आहे की मस्त चालण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. उगाच मनमानी वागलात तर ते तसे होत नाही हे ध्यानात घ्या. म्हणजे खरे तर पथ्यंच म्हणा.. वागण्या बोलण्यातली नव्हे. खाण्यातली तर नव्हेच नव्हे. तर विचार करण्यातील. किंवा खरेतर कुठलाच विचार न करण्यातीलही म्हणू शकतो आपण. म्हणजे काय आहे की कित्येक जण मनमानी जगत असतात. मनमानी म्हणजे काय? तर आपल्याच मनास पटेल तसे आणि तसेच! पाठीचा कणा ताठ ठेवून म्हणे! मग त्यांचे कोणाकोणाशी पटत नाही! समाजाशी नि त्यातल्या धुरिणांशी. कधी याच्याशी कधी त्याच्याशी खटके उडतात यांचे. काय तर म्हणे तत्वांशी निष्ठा असते यांची. असेल. पण सुखी आयुष्याच्या ध्येयाचे काय? मस्त चाललंय आमचं म्हणायला असला आडमुठेपणा नाही चालत. कुणी या गुणाला लढाऊपणा नावाच्या ढालीमागे लपवतात तर कुणी आपला जीवन संघर्ष म्हणवून मिरवून घेतात! मनमानी वागताना इतरांचा विचार नको करावयास? आम्ही तो करतो. म्हणूनच आमचं मस्त चाललंय! आता कुणी कसे वागतो नि काय करतो हे पाहात बसत नाही आम्ही. उगाच नाक खुपसणे रक्तातच नाही आमच्या. आपण बरे नि आपले काम बरे. उगाच समाजात नसत्या उचापती करणे पटत नाही आम्हाला. तर आमचे मस्त सगळ्याच पातळीवर कसे चाललेय ना हेच सांगायचेय सगळ्यांना. म्हणजे मार्गदर्शन म्हणा ना. त्यातून कुणी काही शिकवण घेतली म्हणजे हे सारे सार्थकी लागले समजायचे. तर

व्यक्तिगत नि सामाजिक अशा दोन्ही डगरींवर पाय ठेवत आमचे मस्त चाललेय. खरेतर व्यक्तिगत छान चाललेले खूप सारे असतील, पण सामाजिक डगरीवर पाय घसरला की तोल ढळलाच त्यांचा. नि घसरलेल्या पावलामुळे अपघात ठरलेलाच. अशी अपघाती वळणं आयुष्यात सांगून येत नाहीत म्हणूनच तर जास्त काळजी घ्यावी लागते सगळ्यांना. थोडक्यात आम्ही आमचे मस्त कसे चाललंय त्याचे गुपित किंवा खरेतर  रहस्य.. रहस्य शब्द जरा मोठा आहे वजनाने .. पण वचने किं दरिद्रता म्हटले की काय हरकत आहे.. तर त्याचे रहस्य सांगत आहोत. यातून जे शिकतील ते तरतील. बाकीचे खात बसतील गटांगळ्या. भवसागरात गटांगळ्या म्हणणार होतो आम्ही, पण तसले शब्द वापरायची आम्हाला मुभा किंवा परवानगी नाही. आम्ही कुणी स्वामी किंवा बुवा आहोत थोडीच? असतो तर आम्हीच हे लिहित बसलो असतो? उलट आमच्या भक्तांपैकीच कुणी आमचे लीला चरित्र लिहून आमची महती सर्वत्र पसरवली असती. तर ते एक स्वामी बनायचे राहून गेले. योग्य वयात त्या करियरबद्दल योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने ते एक राहूनच गेले. असो. तर आमचं मस्त चाललंय हे खरं. आणि ते चालण्यासाठी आम्ही खास प्रयत्न केलेत हे अजून एक खरं.

तर या दिशेने वाटचालीची सुरूवात आम्ही अगदी बाल्यावस्थेत केली. आमचे तेव्हापासून पाळलेले एक पथ्य सांगतो. ते म्हणजे थोरामोठ्यांचे ऐकणे! आपल्या संस्कृतीतील हा सर्वाधिक महत्त्वाचा सद्‌गुण अंगी बाणवला आम्ही फार लहान वयात. म्हणजे घरी आम्हाला सांगितले, शेंदूर लावलेला किंवा लागलेला प्रत्येक दगड हा देव असतो.. त्याच्या पाया पडायलाच हवे. थोर सांगतात त्यात चूक कशी असेल? आम्ही शेंदूर लागल्याचा संशय असला तरी त्या दगडाच्या पाया पडतो. त्यातून मिळणारे मानसिक समाधान अवर्णनीय. मग आम्ही आरत्या म्हणतो, पूजा अर्चा करतो. सारे काही यथासांग, अगदी आमचे पूर्वज सांगून गेलेत विचारपूर्वक तसे. या बाबतीत धर्म पाळणे हाच आमचा धर्म आहे. धर्माचाच विषय निघाला म्हणून विसरण्याआधी सांगतो, धर्माभिमान हा आमच्या आयुष्याचा पाया आहे. का? आमचे पूर्वज सांगून गेलेत.. कुणी पाखंडी

सर्वधर्म समभावाचे गोडवे गातात .. कुणी सारे धर्म सारखीच शिकवण देतात असले काही पुराण लावतात. पण आम्ही नाही बधत त्यांना. आम्हाला जाज्वल्य अभिमान आहे.. कारण तशी शिकवण आम्हाला मिळाली आहे. धर्मापाठोपाठ मग आम्ही जातीचा अभिमान, खरेतर गर्व बाळगतो. जातीसाठी माती खावी म्हणतात. आम्ही खातो. त्यात आम्हाला प्रचंड आत्मिक समाधान मिळते. कुण्या हलक्या जातीतील कुणास हीन वा अतिहीन समजल्याने आम्ही प्रगत असल्याचे आम्हाला जाणवते. हीच ती प्रगती आणि उन्नती जिच्यासाठी सारे धडपडत असतात. ती आम्ही सहजी मिळवली आहे. राहता राहिल्या रूढी. उगाच शतकांपासून सुरू राहिलेल्या रूढींना नाकारणे म्हणजे खरा समाजद्रोह. उदाहरणच द्यावे तर त्यात मग अगदी महत्त्वाचा आणि जिव्हाळयाचा विषय म्हणजे हुंडा. या परंपरेबद्दल अजिबात तडजोड नाही करत आम्ही. काळाप्रमाणे बदला म्हणताना हे तथाकथित सुधारणावादी जुन्या रूढी का बरोबर होत्या ते लपवून ठेवतात. आम्ही मात्र तो विचार नाहीच करत. पूर्वापार चालत आल्यात ना रूढी? त्या बरोबर नसत्या तर टिकल्याच कशा असत्या? काळाच्या कसोटीवर उतरलेल्या त्या अशा कुण्या चार दोन डोक्यांनी सांगितले म्हणून बदलाव्यात की काय? आम्हाला तरी हे सारे लोकशाही विरोधी वाटते. समाजातील इतक्या मोठया वर्गाचा पाठिंबा ज्या रूढी आणि परंपरा यांना मिळतो त्यांचा विरोध म्हणजे लोकशाहीस विरोध. असला प्रमाद आम्ही न करतो, न कुणाला करू देतो. असल्या रूढी नि परंपरांची जंत्री देण्याची अजिबात इच्छा नाही आम्हाला. पण एक आहे, आम्ही त्यांच्यावर चुकूनही संशय घेत नाही. आम्ही त्यांचा सन्मान करतो. जिवात जीव असेतोवर पाळतो सारे. मूठभर बंडखोरांना आम्ही भीक घालत तर नाहीच आणि त्यांच्या बोलण्यावर विचार करण्यात वेळही घालवत नाही. किंवा खरेतर आम्ही कशाचाच विचार करण्यात वेळ घालवत नाही. उगाच आपल्या मौल्यवान आयुष्यातल्या मर्यादित अन् तितक्याच मौल्यवान वेळेचा अपव्यय कशाला. आमचे पूर्वज ते सारे करून गेलेत, ते रेडिमेड ज्ञान वापरून घेतो आम्ही. त्यात त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन कसा होता नि आज कसे आपण त्या विज्ञानालाच विसरून चाललो आहोत याबद्दलचे प्रचंड संशोधन हल्ली नवनवीन माध्यमांवर येत असतेच. पण

आम्ही हे सारे न करता तेच तर म्हणत आलो आहोत. उगाच अपराधी भावनेने आमच्या पूर्वजांनी सांगितलेले तेच खरे असले काही कोणास पटवून देण्याची आम्हाला तरी बिलकुल गरज वाटत नाही. त्या समाजातील सुधारक म्हणवणाऱ्यांना करंटेपणा करत नसेल हे सर्व मान्य करायचे तर आम्ही काय करणार? उगाच काही बाही शंका घेत आपले आयुष्य दु:खी करण्याची त्यांची हौस असेल तर होवोत बापडे दु:खी. कदाचित त्यातच त्यांना आनंद वाटत असेल की काय कोण जाणे. पण आम्ही ना जुन्या चालीरितींवर विचार करत, ना त्यांच्यावर संशय घेत त्यांची चिरफाड करत. खरेतर आम्ही सारेच डोळे मिटून पाळत आलेलो आहोत. आणि आम्हाला सांगायला अभिमान आणि आनंद वाटतो की हेच आमच्या आनंदी नि सुखी राहण्याचे रहस्य आहे. म्हणजे बघा ना, कचेरीत आम्ही साहेब म्हणेल ती पूर्व दिशा हे समजून असतो. आपल्याहून वरिष्ठाला चूक म्हणण्याचा उद्धटपणा आम्ही कधीच करत नाही. हा आज्ञाधारकपणा आमच्यात लहानपणापासूनच अंगी बाणवला आहे आम्ही. अहो, त्याचे चूक असते तर तो झाला असता का साहेब? त्याची आज्ञा पाळणे हे आपले नियत कर्तव्य आहे. आणि कर्तव्य श्रेष्ठ हीच आम्हाला मिळालेली शिकवण आहे. तर हेच पथ्य आम्ही सरकारी धोरणाबद्दल पाळतो. लोकशाही मार्गाने आलेले आपले सरकार नि त्याच मार्गाने आलेले सन्माननीय मंत्रीगण. आपल्यापेक्षा कित्येक पटीने योग्यता जास्त असल्यानेच तर त्या पदावर पोहोचले आहेत. त्यांच्या धोरणांना नि त्या मागच्या उद्देशांना संशयाने बघणे असले पापकर्म आम्ही नाही करत कधी. मग विरोध करणे तर दूरची गोष्ट. साधे एक शहाणपण सांगते आम्हाला, ज्याची खावी पोळी त्याचीच वाजवावी टाळी.. आम्ही आधीच टाळी वाजवतो, मग पोळी मिळाल्यावाचून राहतेय थोडीच? अहो, आम्ही पाहिलंय इकडे, लोकं कसली कसली आंदोलनं करतात काय, कसल्या कसल्या घोषणा देत मोर्चे काय काढतात, सरकारी धोरणांवर संशय कसला घेतात, उपोषणे करतात, धरणे धरतात, काहीच नाहीतर पेपरात पत्रेबित्रे लिहित बसतात नि आपलेच मनस्वास्थ्य बिघडवून घेतात. आम्ही यातले काहीच नाही करत. जे कुणी असेल सरकार त्यास डोळे मिटून पाठिंबा हे आमचे एक धोरण असल्याने सरकारी धोरण आम्हाला पटतेच. आणि खरे सांगू तर हे पेपर नि चॅनेलवाले उगाच

सरकार विरोधाच्या ज्वाला भडकवण्याचे काम करत असतात. म्हणून तर आम्ही अग्रलेख वगैरे वाचण्याच्या फंदात पडत नाही कधीच. तर फक्त पेपरच्या रंगीत पुरवण्यातले फोटोच पाहून नयनसुख मिळवतो नि चॅनेलीय माध्यमातही चर्चा नि बातम्यांकडे न फिरकता सास बहुच्या रंजक गोष्टीतच मन रमवतो. आम्ही पाहिलंय काही जणांना, रोज अथ पासून इतिपर्यंत पेपर वाचताना .. अग्रलेख काय वाचतील, संपादकीय पानाचा किस काय पाडतील. आणि कहर म्हणजे त्यावर तावातावाने चर्चा करून स्वतःचा रक्तदाब काय वाढवून घेतील. या सगळ्या चर्वितचर्वणाने कधी झाडाचे पान पण हललेले पाहिलेय कुणी? आणि बाता मारतील दुनियेला हलवण्याच्या! हे असले आम्ही कधी करत तर नाहीच, पण असे काही करण्याचा विचारही आणत नाही आम्ही मनात. आता बाकीच्यांनी हे असे करत कोणाच्या पायात पाय अडकवत जगाच्या कल्याणाची चिंता करण्याचा आव का आणावा.. आमच्या आकलना पलिकडे आहे सारे. खरेतर कशाचाच विचार न करणे, महाजन गेले त्या पंथानेच जाणे हे आमच्या मस्त चाललेल्या आयुष्याचे गमक. कशाचाही कुठलाही प्रश्न पडू न देणे हे आमचे वैशिष्ट्य. एक विचार नि दुसरे प्रश्न पडणे.. दोन्ही हद्दपार करा नि बघा तुमचेही आयुष्य आमच्या सारखे सुखी होते की नाही!

अहो, शेवटी सारे काही करायचे ते आयुष्यातल्या सुखासाठीच ना? आम्ही आमची वाट शोधून घेतलीय.. आम्ही सुखी आणि समाधानी आहोतच.. म्हणून म्हणतो ना, मस्त चाललंय आमचे..

## सारं कसं शांत शांत

आई बाळाला सांगत होती, खोटं कधीच बोलू नये रे.

इतक्यात फोनची रिंग वाजली.

आई सुमनकाकूचा फोन आहे..

हळूच आई म्हणाली, अरे मी नाहीये म्हणून सांग.

आणि बाळ गप्प झाला.

फोन परत वाजला, परत एकदा वाजला..

आणि मग घरात सारं कसं शांत शांत झालं.

***

पार्ला स्टेशन सुटले. गाडी हळूहळू चाललीय.

आज लवकर जायचंय नि नेमका आजच उशीर झालाय.

अजून चर्चगेट पोहोचायचे म्हणजे कमीत कमी पाऊण तास.

बाॅसचा फोन आला, कहां हो भाई?

बस सर, पहुंच ही रहा हूँ. बॉम्बे सेंट्रल में हूँ.. पंद्रह मिनिट में आता हूँ.

गाडीतले सारे ऐकत असतात.

आणि ऐकता ऐकता सारे शांत शांत होत गालात हसतात.

***

कुठल्या तरी नाक्यावर काही पोरं उगाच टवाळक्या करत उभे आहेत.

काही शिट्या फुंकताहेत.

काही जाणारी येणारी कुणी पाहून काही संवाद फेकताहेत.

समोरच देवीचे देऊळ आहे.

आम्ही सारे देवीचे भक्त. ती पोरेही देवळात जाऊन तशीच जय माता दी म्हणतात..

परत देवळाबाहेर येऊन आपल्या त्याच कामाला लागतात.

देऊळ बंद होते, पोरांचे काम सुरूच राहते.

देवळात कसे सारे काही शांत शांत होते.

***

नाक्यावर पोरांचे जथ्थे उभे आहेत.

पोरं कसली, तरूण आहेत, काही मध्यम वयीन आहेत.

सकाळचा वेळ सरला की त्यांना कोण विचारणार?

कुणाला मजुरी मिळेल तो आनंदाने कामावर जात कामचुकार पणा कसा करावा याच्या प्लॅनिंगला लागतो.

ज्यांना काम नाही हाताला ते उगाच बसून राहतात आजच्या जेवणाची चिंता करत.

निवडणूक जवळ आलीय.

समोर सभा आहे आता.

तो काम न मिळालेला एक इसम आनंदाने भाषणाच्या सभेत मिसळून जातो.

नेता घसा खरवडून मते मागताना सांगतोय, बेरोजगारीचा समूळ नायनाट करण्यासाठी त्याला निवडून द्या.

त्या इसमाला त्याचे भाषण पटते.

देशका नेता कैसा हो .. असला भाषण बाज हो.

निवडणूकीत त्यालाच मत.. ठरवून तो घरी निघतो.

सभा संपते.

सभास्थानी सारे कसे शांत शांत होते.

***

ह.भ.प. पांगारकर बुवांच्या कीर्तनाला गर्दी खूप होती.

लोक भक्तिभावाने ऐकत तल्लीन झालेले.

त्यात लहान थोर, बाया बाप्ये सगळेच.

बुवांनी कीर्तनात आख्यान लावलेले ते स्त्री शिक्षणाचे. मुलींना शिकवा, मुलींना मोठे होऊ द्या, लवकर लग्ने लावू नका.

सगळे भक्तिभावाने ऐकत होते.

बुवांनी शेवटचे जय जय रामकृष्ण हारी सुरू केले.

यशोदाबाईंनी नवऱ्याला इशारा केला.

गर्दी होण्याच्या आत दोघे निघाले.

त्याला कारणच तसे होते. घरी कामे खूप पडलेली होती.

त्यांची नववीत शिकणारी बकुळा, तिला पहायला यायचे होते गावाहून.

सगळे वेळच्या वेळी झालेले बरे असते, नवरा बायकोचे एकमत असते यावर.

तिकडे कीर्तन संपते. बुवांच्या पाया पडून लोक घरोघरी पांगतात.

देवळात सारे कसं शांत शांत होते.

***

नामदार रामरावांच्या घरी आज आनंदी आनंद आहे.

नामदार मोठे प्रस्थ. पंचायतीत त्यांच्या नावाचा दबदबा आहे.

नुकतीच कुटुंब कल्याण नि मुलींना वाढवा मुलींना शिकवा अशा समितीवर नेमले गेलेत ते.

गावात त्यांच्या अभिनंदनाचे मोठमोठे फलक लागलेत तर तिकडे शहरात त्यांच्या अभिनंदनाची सभा आहे.

पण आनंदाची बाब तर वेगळीच आहे.

सात मुलींपाठोपाठ त्यांच्या घरी वंशाचा दिवा जन्मलाय.. आठवा मुलगा झालाय त्यांना.

रामरावांच्या आनंदाला सीमा नाही आता.

त्यांच्या आनंदात गाव आनंदी आहे.

गावातील एक अतिशहाणा.. त्याला यातील विरोधाभास दिसतोय.

तो नाक्यावर निषेधाचे पत्रक चिटकवतो.

रामरावांची माणसं सजग आहेत. त्याचे हातपाय तुटतात.

शहाणा माणूस हाॅस्पिटलात पोहोचतो.

आणि गावाकडे सारं कसं शांत शांत होते.

***

नकुशी आता मोठी झालीय.

शहाणी देखील.

तिच्या पाठचे दोन भाऊ.. वंशाचे दिवे.. दारू पिऊन रस्त्याच्या कडेला पडतात..

आज ही तीच त्यांना शोधून घरी आणते.

आई बाप कंटाळलेत सगळया गोष्टींना.

पोरं दारूडी आहेत तर एक ठीक..

पोरंच ती. प्यायली दारू तर काय बिघडले.

ही नकुशी नसती जन्मली तर घरात खाणारे एक तोंड कमी झाले असते.

हाता तोंडाशी गाठ पाडताना नाकी नऊ येतात सगळयांच्या.

मग आई बाप नकुशीला नाही नाही ते बोलतात आणि आपला क्षोभ शांत करून घेतात.

तिकडे शहाण्या नकुशीला सारे काही शांत शांत वाटत राहते.

***

राजाला राज्य करायची हौस मोठी.

राजा छानपैकी एक हुकूम सोडतो..

आपल्या हुकुमाची कशी अंमलबजावणी करताहेत सारे हे बघण्यातली गंमत काही औरच.

सामान्यातिसामान्य त्याच्या हुकुमाने हवालदिल होतो.

पण लवकरच सावरतो. आपल्याला असाच राजा हवा जो हुकूम सोडून काम करवून घेईल.

त्यासाठीच तर राजाला गादीवर बसवलेय आपण.

हुकूम पाळता पाळता सामान्य थकून जातो पण राजाचा चेहरा आठवत रेटत राहतो.

त्यातला एक म्हातारा इसम म्हणतो, हा हुकूम मी पाळू कसा..

सारे त्याला गप्प बसवतात.

शंभरांपुढे बिचारा एकटा, त्याचा आवाज कुणाला ऐकू येणार?

सारे राजाज्ञेच्या पालनात गुंग होतात.

म्हातारा मध्येच दम तोडतो.

सामान्य आपले हुकूम पालनात दंग आहेत.

म्हातारा देवाघरी पोहोचून आपल्या मुक्तीची वाट पाहतोय..

खाली कल्लोळ चाललाय सामान्यांचा..

आणि म्हाताऱ्याच्या दुनियेत सारे कसं शांत शांत आहे.

***

तोच राजा. त्याचाच नवा हुकूम.

सामान्य सरावलेत आता.

पण जरा जास्तच जुलमी झालाय की काय हुकूम .. पब्लिकला संशय येतो.

पब्लिक खवळले की कोणाचे ऐकत नाही.

रस्तोरस्ती पब्लिक उतरते. मोर्चा काय नि आंदोलनं काय .. निषेध सुरू राहतो.

राजाच तो. सगळ्या निषेधांवर बंदी आणतो.

त्या बंदीचा ही लोक निषेध करतात.

बंदी आणि निषेधाचा सिलसिला सुरू होतो.

राजा एकेकाला पकडून तुरूंगात डांबतो.

एक गेला की त्याची जागा दुसरा घेतो.

राजा तुरूंग भरत राहतो. लोक काही बधत नाहीत.

लोक लढा संपत नाहीच.

राज्य उलथून नवा राजा येतो.

नव्या राजाचे नवे तंत्र. लोक वैतागतात.

परत निषेधार्थ सुरू होते ..

हा राजा हुशार आहे

नव्या राजाचा संयम संपतो. कुणी त्याच्या अधिकारालाच आव्हान द्यावे?

राजाचे सैनिक काहींना गोळ्या घालतात.

तुरुंगापर्यंत ठीक होते. जिवाशी गाठ म्हणजे फार झाले.

शेवटी राजाच्या दमनशक्ती पुढे कोणाचे काही चालत नाही.

एक एक जण माघार घेत घरी जातात.

राज्यात सारे कसं शांत शांत होते.

***

तसाच दुसरा राजा शांतीस्वरूप म्हणजे शांततेचा पुजारी. शांतिदूत म्हणून प्रसिद्ध सगळीकडे.

त्या राजाच्या राज्यात आता मात्र कहर झाला.

रस्तोरस्ती लोक राजाविरूद्ध पेटून उठले.

कारण काही असो, पण सगळीकडे अशांती पसरली.

एका गावातून दुसरी कडे, तिकडून तिसरी कडे.

वणवा पसरावा तशी अशांतता.

राजा नावाला जागत जागा झाला.

सारे निषेध बेकायदेशीर घोषित झाले.

न ऐकणाऱ्यांच्या आधी मुसक्या आवळल्या गेल्या.

कोर्टातील खटल्यात देशद्रोही घोषित करून फाशी गेले काही जाहीरपणे.

काहींची जीवनयात्रा कुणाच्या नकळत संपवली गेली.

परिणाम व्हायचा तोच झाला.

बंड थंड झाले. सगळीकडे शांतता पसरली..

शांतिस्वरूप राजा नावाला जागला.

आणि सारे कसे स्मशानशांत शांत झाले.

# सभात्याग: एक करणे.

आपल्या देशात लोकशाहीची पाळंमुळं खोलवर रुजली आहेत. लोकशाहीचा वटवृक्ष बहरलेला आपण पाहतो आहोत. त्याच्या पारंब्यांना लटकून झोके घेणारे भाग्यवान दिसतात आपल्याला. त्याला आलेली फळे पण आपल्याला दिसतात. काही निवडक भाग्यवंत ती चाखताना दिसतात. नगरसेवक, आमदार नि खासदारच ती चाखताना दिसतात म्हणून वाईट वाटायचे काहीच कारण नाही. कारण तेही आपलेच बांधव आहेत, आपल्याच देशाचे नागरिक आहेत. मधे एकदा पेपरमध्ये कुणी नगरसेवक रोडपती चा करोडपती झाल्याबद्दल टीका आली होती. पण एखाद्याच्या उत्कर्षात वाईट वाटून घेणे सुसंस्कृत माणसाचे लक्षण नव्हे. खरेतर अशा कोणाच्या उत्कर्षात अन् उन्नतीत समाधान मानणे हेच सुसंस्कृतपणाचे लक्षण मानले गेले पाहिजे. आपल्यातील काही श्रीमंत होत असतील तर ती श्रीमंती कधी ना कधी खाली आणि खोलवर झिरपून आपल्यापर्यंत पोहोचेलच. त्यामुळे उगाच त्याबद्दल कडवटपणा असणे अयोग्यच आहे. तर ते एक असो. तर मुद्दा लोकशाहीचा आहे. आणि एकदा लोकशाही म्हटली म्हणजे सारे काही लोकांच्या चर्चेत यायलाच हवे. बिच्चारे लोकप्रतिनिधी! काही करायला गेले की लोकांच्या नजरा टपलेल्या त्यांच्यावर. आणि एकवेळ लोक बरे करतील कानाडोळा .. पेपरवाले नि चॅनेलवाले थोडीच सोडणार कुणाला. टीका तर होणारच. मग तो कुणी संसदेत असांसदिय भाषेत उपस्थित केलेला मुद्दा असो वा कुठल्याशा मुद्दयावर कुणी कुणाला दिलेला गुद्दा असो. बिचारे आमदार खासदार तोंड दाबून बुक्क्यांचा मार करत असतात सहन. त्यावर परत त्यांना गेंड्याची कातडी असल्याचे शेरे नि ताशेरे ऐकून घ्यावे लागतात.

संसद वा विधानसभेचे अधिवेशन म्हणजे बातमीवाल्यांची पर्वणी. अॅक्शन पॅक्ड अशा दिवसांत बातम्यांना तोटा नाही. चॅनेलवाले तर अशी अधिवेशने सतत भरावीत म्हणून प्रार्थना करत असावेत. अधिवेशन म्हणजे सत्ताधारी प्रपोझेस आणि विरोधक डिस्पोझेस.. मग त्या विरोधात कुणी किती आक्रमक होतेय याच्यावर ठरतात टी आर पी. चॅनेलच्या. आणि त्या आमदार खासदारांच्याही. अशा या सर्वेन सुखिन: वातावरणात पेपरवाले नि चॅनेलवाले 'संसदेत गोंधळ' असल्या हेडलाईन्सही देताना दिसतात. मारधाड, राजदंड पळवणे, अध्यक्ष्यांसमोरील वेलमध्ये उतरणे, माईक तोडणे इ. विशेषाधिकारी अन् काहीही झाले तरी ज्यास कायदा हात लावू शकत नाही अशा कृती करणारे मान्यवर माननीय नामदार लोकसेवक अशा सगळ्या कृत्यांनी कृतकृत्य होत अधिवेशन भत्ता घ्यायला लायनी लावतात. शेवटची लायनी लावायची आमची कल्पना खास निम्न मध्यमवर्गीय. अशा देवाच्या खास लाडक्या खासदारांस कुणापुढे ताटकळत हात वेंगाडत उभे ठेवावयास ते कुणी जनसामान्य नव्हेत. देशासाठी मागे निश्चलनीकरणाच्या वेळी कित्येकांनी बलिदान केले रांगेत. अशा जनसामान्यांस देशभक्ती ही सिद्ध करून दाखववी लागते तर आमचे लोकसेवक पदसिद्ध देशभक्त आहेत. त्यांचा अमूल्य वेळ त्यांनी रांगेत का दवडावा? तर हे असे आहे. जिवाचे रान करून या सगळयांनी संसदेत आवाज उठवावा.. या शेळीने जिवानीशी जावे आणि या मिडियावाल्यांनी त्यास वातड कसे म्हणून हिणवावे?

आणि मग या लोकप्रतिनिधींवर टीकेची झोड उडवण्यास सारे तयार. त्यात सर्वात बदनाम काय असेल तर सभात्याग. सभागृहातील आरामदायक खुर्च्या आणि अॅक्शनपॅक्ड वातावरण सोडून जाताना सगळयांना काय वेदना होत असतील कुणी विचार केलाय याचा?

आमचे स्पष्ट मत आहे, सभात्याग हा एक प्रकारचा सत्याग्रहच आहे. सत्याग्रह ही गांधीजींची जगाला देणगी मानली जाते. त्याची राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा होते. अगदी सत्याग्रहाचे एक आंदोलन म्हणून कौतुक होते. पण याच देशातील याच मातीतील आमदार,

खासदारांनी शोधलेल्या सभात्यागाच्या आयुधाची दखल सकारात्मक घेतली जाऊ नये? याहून मोठा दैवदुर्विलास तो कोणता? ते सर्व बिचारे फक्त टीका आणि टवाळीचे धनी व्हावेत? कशी राखली जाणार लोकशाहीची बूज?

लोकशाहीत आंदोलने कित्येक प्रकारची असतात. आंदोलने का होतात? तर आंदोलनानी सर्व व्यवस्था हलवून सोडली पाहिजे. म्हणजे बघा, समजा एखादा सत्याग्रही आमरण उपोषणाला बसलाय आणि दहा दिवस गेले तरी त्याची प्रकृती धडधाकट आहे .. असे असेल तर त्या उपोषणाचा उपयोगच काय? जोपर्यंत त्याची प्रकृती नाजूक होत नाही तोपर्यंत काही मजा नाही. सर्व व्यवस्था तेव्हाच हलेल जेव्हा तो मरणाला टेकेल. थोडक्यात काय तर आंदोलनानी हलवून काढले पाहिजे. सभात्यागाचे तसेच आहे. त्याआधी नांदी म्हणून मारामारी, माईक तोडणे, राजदंड पळवणे, खुर्च्या फेकणे, वेलमधे उडी मारणे अशा गोष्टी कराव्याच लागतात.तो खरा लढाऊ बाणा झाला. सारी व्यवस्था हलवायची तर इतके तर करायला हवेच. आणि त्यापाठोपाठ श्रम परिहार म्हणून सभात्याग व्हायला हवाच! कुठे चार डोकी फुटली, कुठे मारामारी झाली रस्त्यावर तर त्याची बातमी होत नाही. आणि लाखांच्या प्रतिनिधींनी जनहितार्थ असे काही सदनाच्या आत केले की लगेच या मिडियावाल्यांना कंठ फुटावा? तरी बिचारे हे सारे मनाला लावून घेत नाहीत म्हणून. उद्या हे सारे बंद झाले तर चॅनेलीय दुकाने चालायची कशी आणि पेपरवाल्यांनी काय पेज थ्रीच पहिल्या पानावर छापायचे?

थोडक्यात काय तर हा सभात्याग नाहक बदनाम झाला आहे. अर्थात टिंगल टवाळी कुणास चुकली आहे? व्यंगचित्रकार तर अशा गोष्टी आपल्या काकदृष्टीने पाहात असतात. जरा खुट्ट झाले की उचलला कुंचला नि लावला पेपरावर. हास्यचित्रे झाली म्हणून ती हसण्यावारी नेता नाही येत. आपल्या त्यागाधारित संस्कृतीत या सभात्यागावर अशी टवाळीची वेळ यावी? किती दुर्दैवी आहे हे. मासल्यापुरता ही व्यंगचित्रे पहा नुसती .. एक तरूण तुर्क, नुकताच आलेलाय निवडून ..

लग्न पण नवीनच झालेलेय.. नव्या नवेल्या पत्नीस सांगतोय, डार्लिंग, तयार हो लवकर, हा गेलो नि हा आलो सभात्याग करून .. दोन तिकिटे काढलीत सिनेमाची! एका ठिकाणी ती पत्नी विनवतेय, लोकसभेतल्या वेल मध्ये उतरू नका हां, पोहता येत नाही तुम्हाला! तर एक अजून उत्साहाने फुरफुरलेला नामदार सांगतोय, वॉक आऊट इज अ सीक्रेट आॅफ माय फिटनेस.. किती चालतोय महाराजा रोज! एका गुळगुळीत लाईफ स्टाईल मॅग मध्ये तर लोकसभेतल्या नि विधानसभेतल्या वॉक आऊटमधून खर्च होणाऱ्या कॅलरीजचा तक्ताच दिला गेला होता मध्ये. थोडक्यात काय, कुणाची स्टाईल तर कुणाची लाईफ स्टाईल म्हणायची ती!

आपल्या बिचाऱ्या नामदारांनी ऐकून तरी किती घ्यावे? आणि काय काय ऐकावे? विचार करा उद्या सारे झाले एक आणि ठरवले त्यांनी की या पुढे फक्त संसदीय आयुधांचा वापर करून निषेध करायचा. सदन उघडले, सभापती आले, सारे उभे राहून गुड माॅर्निंग सर म्हणून बसतात. मग सदनाचा कारभार सुरू होतो. विरोधकांचे काम विरोध करणे.. खरे तर कर्तव्यच ते त्यांचे .. मग विरोधी नेते कुठल्यातरी २१ए कलमाखाली सरकारला जेरीला आणताहेत.

तुम्हीच सांगा 'कलम११० चा विरोधकांकडून प्रभावी वापर' किवा '२१ए खाली सरकार अडचणीत' ला काही बातमी मूल्य आहे का? ब्रेकिंग न्यूज म्हणून 'संसद में तमाशा. खुर्सियोंसे मारधाड' हेच योग्य वाटत नाही का? या सर्वांनंतर सभात्याग करणे हा श्रमपरिहार एखाद्या जेवणानंतरच्या स्वीट डिश सारखे. बातमीदारांची पर्वणी. हे सर्व नसले तर अधिवेशनांत काय राहिले? अशा मिळमिळीत लोकशाहीपेक्षा ढळढळीत हुकूमशाही बरी.

याउलट आपल्या सर्व वयोवृद्ध आमदार खासदारांसाठी सभात्यागाची सोय म्हणून कन्व्हेयर बेल्टची सुविधा उपलब्ध करावी याकरता मिडीयानेच प्रेशर आणले पाहिजे. शेवटी बातम्यांची सोय नि टी आर पी आणून देणारे मायबाप हेच तर आहेत..

शेवटी 'सभात्याग : एक करणे' आहे एवढे तरी मिडियाने स्वत:च्याच स्वार्थासाठी तरी ध्यानात ठेवायला हवे, नाही का?

# लोकपाल टोपीची गोष्ट!

लोकपालाचे दिवस!

सगळीकडे लोकपाल टोपीतले लोक. लोकपाल नावाची जादूची कांडी येईल आणि भ्रष्टाचाररूपी राक्षसाचे निर्दालन करेल अशा विश्वासाने! मी पण आज टोपी घ्यायचीच असे ठरवले होते.

साहेबांच्या केबिनमधून चावडा बिल्डरच्या 'खास माणस'ने बाहेर पडता पडता मधाळ हसत माझ्या हातात हिरवी नोट कोंबली. मी त्याच्या डोक्यावरील अण्णाहजारे टोपीकडे बघतोय हे लक्षात आले तसा म्हणाला,

"समदाज लोग घालते.. पन तेलपानी वगर मिशीन चालेल काय.. सांग तू.."

नोट मी खिशात ठेवली. आजची दहावी!

मी आणि साहेब.. उसूलचे पक्के! ऑफिसात लाखांचे सौदे रजिस्टर करायला शेठजी मंडळी येतात म्हणून भाव वाढवून सांगायची ना बेईमानी केली कधी ना पैसे घेऊनही काम न करण्यासारखा भ्रष्टाचार!

दुपारच्या सुटीत बाहेर पडलो.

बाहेरच एक कोणी '२० का २५' ओरडत अण्णाहजारे टोप्या विकत होता.

म्हटले "क्या २० का २५"

तर म्हणाला, "टोपीका शॉरटेज.. लेनेकाय तो लो."

म्हटले लोकपालानी कोट्यावधींचा भ्रष्टाचार संपणार असेल तर हा पाचेक रुपयाचा भ्रष्टाचार करायला काय हरकत आहे!

टोपी घालून साहेबांच्या केबिन मध्ये गेलो.

"छान आहे टोपी" साहेब म्हणाले, "कितीची?"

२० का २५ ची गोष्ट सांगितली. त्यावर साहेब म्हणाले,

"थांब.. लोकपाल आला ना की सगळा भ्रष्टाचार नाहीसा होईल. जा माझ्यासाठी पण एक घेऊन ये."

त्यांनी आपल्या शर्टाच्या खिशात हात घातला. त्यात सर्व पाचशेच्या नोटा! मग पँटच्या खिशातून पाकीट काढून २५ रुपये सुट्टे देत म्हणाले,

"अशीच आण बरंका."

त्यांच्यासाठी एक टोपी घेऊन आलो. डोक्यावर ती चढवत साहेब म्हणाले,

"टोपी-बीपी ठीक . पण पार्ट्यांना आपले रेट सांगायला विसरू नकोस, टोपी पाहून गैरसमज व्हायचा. शेवटी व्यवहार सांभाळलाच पाहिजेना"

म्हणता म्हणता त्यांचा हात शर्टाच्या खिशावर गेला.

ती टोपी माझ्या आणि साहेबांच्या डोक्यावर काही दिवस होती. नंतर दोन्ही टोप्या कुठे गेल्या कुणास ठाऊक.

# सत्यदेवाचे मंदिर

मी आणि माझा मित्र निघालो. मित्र म्हणजे वय वर्षे आठ. बालमित्र. माझा भाचा, गावाहून आलेला. अति हुशार आणि चतुर, चलाख आणि वयाच्या मानाने बऱ्यापैकी सामान्य ज्ञान असणारा. गोपिनाथ ऊर्फ गोपू.

रस्ता ओलांडून आलो तर सत्यदेवाचे मंदिर समोर होते. 'श्री क्षेत्र सत्यदेव. जय सत्यदेव. सत्यमेव जयते.' असे वर्णन खाली.

"सत्यदेव? हा कुठला रे देव मामा?"

"मी पण नाही ऐकला रे."

"ऐक ना मामा, गायीच्या पोटात तेहतीस कोटी देव असतात ना, त्यातला एक असणार. आपल्याला त्यातले काहीच माहितीयेत ना?"

"खरंय, गोपू तू हुशार खरा. तुला शाळेतल्या सर्वांची नावे ठाऊकेत?"

"हो?"

"किती? तेहतीस कोटी?"

"काय पण मामा.. चल आपण हा देव पाहूयात."

"चल. पण काहीच हट्ट करायचा.."

"नाही .. तुला नि आईला मी लहान वाटतो का रे? हट्ट करायला? मी कधीच मोठा झालोय!"

"खरंच की रे! चल जाऊया."

आम्ही मंदिरात शिरलो. मुख्य देऊळ होते ते सत्यदेवाचे. आणि आजूबाजूस 'स्वातंत्र्य', 'समता' 'बंधुता' यांची उपदेवळे होती.

"मामा हे काय रे? असले देव? ना कधी ऐकलीत नावे. कायपण. स्वातंतर् ,समता नि बंधूता आणि त्याची देवळे? आमच्या गावी आहे घोडदेव नि एक चांगुणादेवी. पण ती नावं कशी देवासारखी वाटतात ना मामा?"

"गोपू, आपण पाहूयात चल काय आहे तिकडे."

मंदिराचा परिसर गर्दीने फुलून आला होता.

सत्यदेवाच्या दर्शनास अलोट गर्दी होती. गाभारा भरून ओसंडून वाहात होता. आम्ही थोडे दूर उभे होतो. गोपूला काहीच दिसेना. मग त्याला खांद्यावर बसवून पाहू लागलो. गोपू खुशीत माझ्याच केसांना पकडून ऐटीत बसला.

"मामा हे काय रे.. एवढी गर्दी?"

"अरे, देव आणि देऊळ म्हटले की गर्दी असायचीच. आमच्याकडे झुकझुक गाडीत याहून जास्त गर्दी असते."

"झुकझुक गाडी? मला नेशील मामा?"

"नक्की. डोक्यावर बसणार नसशील तर कुठेही नेईन तुला."

समोर गर्दी वाढत चाललेली. काही पुढारी वाटावेत असे लोक लायनीत उभे.

"मामा, तिरसिंग पाटील पहा .."

"कोण रे?"

"अरे तो, पांढरी टोपी घातलेला. अामच्या गावचाय. महा डांबीस म्हणजे आई म्हणत होती. म्हणे तो अाताच खडी फोडून आलाय.. खडी फोडून म्हणजे काय रे मामा? रस्त्यावर खडी फोडायला मशीन असते ना.. मग तिरसिंग पाटील खडी का फोडतात?"

गोपूच्या प्रश्नास काय उत्तर द्यावे याचा विचार करेपर्यंत पाठच्या लायनीतल्या टोप्यांकडे लक्ष गेले. राजकारणी लोकांची लाईन? तीही इथे? मी पुढे होऊन पाहू लागलो. गोपू माझे केस ओढून धरत आरामात बसलेला.

समोर देवळातील पुजारी पावतीपुस्तक घेऊन बसला होता. मी कान देऊन ऐकत होतो.. तिरसिंग पाटलाचाच नंबर होता

"पाच हजार पंचावन्न .." भटजीने सांगितले.

पाटलाने खिशातल्या नोटांची चळत बाहेर काढली. त्यातल्या काही नोटा पुढे केल्या. वरून पाचशेच्या दोन भटजीला देत म्हणाला, "हे तुमचे गुरुजी. ठेवा. पण ती पूजा यथासांग होऊ देत, मग अभिषेक. च्यायला, त्या केस मधून मान सुटायला हवी. सत्यदेव लई पावरबाज द्येव."

"खरंय पाटील," भटजी त्या नोटा कुठे दडवाव्यात या पेचात पडला असावा. बोलता बोलता आपल्या सोवळयाच्या एका काठात गाठ मारत त्याने त्या ठेवून दिल्या. मी दुरून पाहिले, भटजी बुवांच्या उपरण्याला गाठीच गाठी होत्या. त्यात जागा नाही म्हणून नव्या जागेचा शोध चाललेला तर! पाठोपाठ अजून काही गांधीटोपीवाले आले. तसाच काही व्यवहार झाला. मग सुटाबुटातले काही आले. तुकतुकीत कांतीवरून गर्भश्रीमंत असावेत वा कोणी उद्योगपती वा धंदेवाले. त्यांच्यासाठी रेट वेगळा असावा. सत्यदेव इथे पैसे घेऊन खऱ्याचे खोटे करत असावा की काय? पण देवाची काय चूक? तो मुका बिचारा कुणीही हाका म्हणावे तसा, मुक्याने गाभाऱ्यात उभा होता. हे अन्य देवांसारखेच होते!

"हे काय बोअर आहे.. मामा तिथे चल ना.."

दुसऱ्या लायनींकडे बोट दाखवून गोपू बोलला.. नि ती मुख्य लाईन सोडून आम्ही स्वातंत्र्य देवाच्या लायनीजवळ आलो. सत्यदेवाला नवस बोलून लोक इकडे येत होते.

गोपू माझे केस आधारासाठी ओढत आरामात खांद्यावर खुर्चीवर बसल्यासारखा बसून बघत होता आजूबाजूला. आम्ही स्वतंत्रदेवाच्या छोट्या देवळाकडे निघालो तर जाता जाता म्हणाला,

"मामा, तिरसिंग पाटीलांनी पैसे कशाला दिले?"

"गोपू, मला कसे माहिती असणार?"

गोपूचा निरागसपणा या जगात किंवा हे जग अजून किती वर्षे टिकू देतंय कोणास ठाऊक.

स्वतंत्रदेवाच्या गाभाऱ्यात लोक लायनी लावत होते, पण सगळ्यांनाच तिकडे उभे राहण्याची परवानगी नव्हती. 'बारा ते पन्नास वयातल्या स्त्रिया आणि काही विशिष्ट धर्म व जाती यांना प्रवेश निषिद्ध' अशी पाटी होती. त्यामुळे रांगा थोड्या छोट्या होत्या इकडे.

"मामा, मी पाटी वाचली ती. या लोकांना का नाही परवानगी?"

"अरे, असतात एखाद्या देवळाची धोरणे."

"धोरण म्हणजे काय मामा?"

"अरे, धोरण म्हणजे पाॅलिसी. ते आपले धोरण बनवण्यास स्वतंत्र आहेत.. आणि स्वतंत्र देवाचेच तर आहे हे देऊळ ना?"

"स्वतंत्र म्हणजे काय रे मामा?"

"काय सांगू? तू माझ्या डोक्यावर बसून माझे केस ओढत कसा बसलायस ना .. त्याला स्वतंत्रपणे बसणे म्हणतात!"

"काय पण मामा! मला लहान समजून काहीही सांगू नकोस."

"अरे, तू लहानच आहेस, फक्त आता एकच ध्यानात ठेव, देव एकच, फक्त काही जण जास्त स्वतंत्र आहेत इकडे.. काही कमी! पण स्वतंत्र मात्र सारेच आहेत."

"हा देव जास्त मजेदार नाही वाटला मामा, चल दुसरीकडे जाऊ."

"माझ्याकडे बोललास ते ठीक, तुझ्या आईसमोर नको बोलूस, देवाला मजेदार म्हणशील तर आई कान पिरगाळून मजा आणेल तुझ्या डोळयांसमोर."

"चल ना रे मामा, ते समता देऊळ बघूयात.."

"चल."

गोपूने गाडी चालवावी तसा आवाज तोंडातून काढला नि स्टियरींग फिरवावे तसे माझे डोके त्या समता देवळाच्या दिशेने फिरवले.

समता देवळात तर वेगवेगळ्या लायनी लागलेल्या दिसत होत्या. गोपू म्हणाला, "मामा या बघ लायनी लागल्यात. पण अशा तीन तीन का आहेत मामा?"

"थांब रे, मला बघू दे, मग सांगेन तुला."

आम्ही उभे राहिलो तर समोर पाटी होती.

पहिली छोटी रांग होती ती पैसे देणाऱ्यांसाठी. जितके जास्त पैसे तितके जलद दर्शन अशी पाटी होती त्यावर. लायनीतले लोक ही सुटाबुटातले. म्हणजे सूट घातलेले पण बूट बाहेर काढून

मोजे घातलेले. दुसऱ्या लायनीत पैसे भरून पण, पण मध्यमवर्गीय दिसणारे. आणि तिसऱ्या लांबलचक लायनीत उभे ते गरीब वर्गात मोडणारे. पहिल्या लायनीतले दुसऱ्या नि दुसऱ्यातले तिसऱ्या लायनीतल्यांकडे तुच्छतेने पाहात उभे होते.

गोपूने घोड्याचा लगाम खेचावा तसे माझे केस ओढले नि म्हणाला,

"पण मामा समता म्हणजे काय?"

"समता म्हणजे सगळे सारखेच. कोणी मोठा नाही नि कोणी छोटा नाही."

"म्हणजे मी मोठा झालोय ना मामा?"

"अर्थात .. उतर अाता खाली."

"हे रे काय मामा? इतका काही मोठा नाही झालाय मी. पण समान म्हणजे? देवादारी सारे समान असतात म्हणतात ते ना मामा? नाही असे कीर्तनात ते बुवा म्हणालेले अामच्या गावी."

"अरे, तुला नाही कळणार, काही अधिक स्वतंत्र असतात तसे काही अधिक समान ही असतात. आणि देवादारी सर्व समान ही पाॅलिसी आहेच अापली बाकी सर्व पाॅलिसींसारखी."

"मामा तू नीट सांगत नाहीस. इंग्रजी मला नाही येत."

"अरे, मोठा होशील तेव्हा कळेल अापोआप तुला."

"म्हणजे मी लहान आहेच.. मी इथेच बसणार मामा!"

"बस.. घरी गेलो की तुझ्या अाईलाच खांद्यांना मालिश करून द्यावी लागेल. वर केस ओढतोयस ते वेगळे."

"अरे मामा, आता एकच राहिले देऊळ, चल त्या तिकडे, चल मेरे घोडे.."

गोपूने आमची वरात बंधुता देवळाकडे हाकली. बंधुता देवळात रांग होती लांबलचक आणि नुसती रांग असली तरी ठीक, तिथे गलका सुरू होता. कुणीतरी रांग मोडून पुढे जात होता नि त्याची बाकीच्या लोकांशी बाचाबाची सुरू होती. मातृपितृ आदि घराण्यातील जिवंत असल्या नसलेल्या पूर्वजांचा उद्धार होत होता. देवळाचा पवित्र गाभारा त्या आवाजांनी दुमदुमत होता. गोपू त्या आवाजाने थोडा भांबावला असावा, कारण एकाएकी गप्प झाला तो. मग म्हणाला,

"मामा ते का भांडताहेत?"

"अरे, ते भांडताहेत, खोटे खोटे.."

"म्हणजे मी आणि माझी ताई भांडतो तसे? लुटुपुटीचे भांडण?"

"हुं. बंधुता देऊळ आहे ना हे म्हणून रे, भावा बहिणींतले खोटे भांडण सुरू आहे रे."

"चल, तू खोटे बोलतोयस मामा, आम्ही काय भांडताना शिव्या नाही देत काही. हे लोक देवासमोर असे भांडणात तर देव रागावणार नाही? मी आणि ताई भांडतो ना तर आई म्हणते, देवासमोर भांडलात तर देव शिक्षा देईल. या सगळ्या काकांना शिक्षा देईल देव? सांग ना मामा .."

"चल गोपूनाथा, घरी जाऊयात. अरे, आई वाट पाहात असेल."

"थांब ना मामा, आपल्याला देवाचे दर्शन नाही घ्यायचे?"

"नको रे, बघितलंस ना गर्दी किती आहे ते. चल जाऊयात."

आम्ही परत निघालो. गोपू खांद्यांवरून खाली उतरून बोट धरून आनंदात चालायला लागला. थोड्यावेळाने म्हणाला,

"मामा, मोठी माणसं अशी का वागतात रे?"

"अशी म्हणजे?"

"भांडतात. ती मोठी झाली म्हणून भांडतात की भांडतात म्हणून मोठी होतात मामा?"

"तुला काय वाटते गोपू?"

"मामा, भांडल्यामुळे मोठे होत असतील तर मी पण मोठा ना! मी आणि ताई जाम भांडतो.. पण मामा मला ना वाटते, माणसं मोठी झाली की मग भांडायला लागतात."

"बरं गोपूनाथा, चला. आता समोर दिसतोय त्या खेळणेवाल्याकडे न बघता चला.."

गोपू खरंच हट्ट न करता चालू लागला. त्याच्या डोळयांतली खेळणी बघताच आलेली चमक मी पाहिलेली होती.

आम्ही त्या खेळणेवाल्या समोर उभे राहिलो.

खेळणेवाल्याकडची चारचाकी आपल्या मुठीत घट्ट पकडत गोपू म्हणाला, "मामा, किती टाॅप गाडीय, मला आवडली."

त्याच्या डोळयांतली चमक हेच सांगत होती.. पण मोठेपणाचा आव त्याला हट्ट करण्यापासून थांबवत असावा.

मी ती गाडी त्याला घेऊन दिली.

तो आनंदात बागडत चालत होता माझ्या बरोबर. हातात ती गाडी पकडून. म्हटले हेच ते वय, खेळायचे नि बागडायचे. पुढे मोठा होणारच आहे तो एक दिवस.. नि समजणारच अाहे त्याला एक दिवस.. ही दुनियादारी.

# मंत्रालयातील साक्षात्कारी आग

काही वर्षांपूर्वी मंत्रालयाच्या दोन मजल्यांना आग लागली. महाराष्ट्रासारख्या महा राज्यात अशा अनेक आपत्ती कोसळत असतात. अस्मानी नि कोणी कबूलणार नाही, पण सुलतानी ही. या आपत्ती व्यवस्थापनाकडे थोडे वेगळ्या नजरेने पहायला हवे. हा आमच्याकडील उल्टा चष्मा तर देणार नाही आम्ही कुणास पण त्यातून पाहून रेडिमेड उत्तर तर देऊ शकतो आम्ही. खरेतर रेडिमेड उत्तर नाही हे, आम्ही आमच्या चष्म्यातून पाहून हुडकून काढलेले उत्तर आहे हे. खरेतर तो एक सरकारी अहवाल आहे. पण सरकारी भाषा कुणास कळते? आणि किती जण ते वाचतील? म्हणून आम्ही त्यात आमच्या शक्य तितक्या ललित भाषेत भर घातली आहे. असे असले तरी त्याचा गाभा हा सरकारी अहवालातच आहे. तो वाचलात की त्याने कित्येकांचे डोळे उघडण्यास हरकत नसावी!

*****

आपत्ती काही सांगून येत नाही असे म्हणतात. आता हे कोणी थोरामोठ्याने सांगायला हवे असे नाही. पण मोठया माणसांनी सांगितले की त्या नुसत्या बोलांचीही वचनं होतात. तर पंचमहाभूतांपैकी कोणीही कधीही संकट म्हणून अकस्मात उभा राहू शकते. पण खरे सांगायचे तर पंचमहाभूतांचे काही खरे नाही. नुसते भूत पुरेसे नाही म्हणून महा भुताने आपला प्रताप दाखवावा? अग्निदेवाने तांडव नृत्य करावे आणि त्यात लोकशाहीतील सर्वोच्च व्यवस्थेस धक्का बसावा? लोकशाही धोक्यात म्हणून बोंबाबोंब करणाऱ्यांस आयते कोलित द्यावे? 'लोकशाही खतरे में' हे विरोधकांचे आवडते वाक्य आहे.. मग या लोकशाही व्यवस्थेत आज सुपातले विरोधक जात्यावर बसले की जात्यावरचे परत सुपात जातात.. आणि त्याच बोंबा ठोकत सुटतात. तरीही

या अग्निदेवतेने लोकशाहीच्या घरावर म्हणजे मंत्रालयावर हल्ला चढवावा नि त्यात दोन मजले जळून खाक व्हावेत?

झाले ते होऊन गेले.

काही वर्षांपूर्वीची गोष्ट ती. आता आठवण का यावी? सत्तांतराच्या सततच्या चर्चेने मंत्रालय गजबजते असते. आगीच्या भक्ष्यस्थानी दोन मजले पडता पडता त्यादिवशी दोन कार्यक्षम मंत्र्यांनी चॅनेल्सना बाईट दिले म्हणून कोणी वाईट टीका मिडियातून केली. त्यांचे आकलन किती मर्यादित आहे हेच त्यातून दिसत नाही का? एकूण मंत्रिमंडळाचे आकारमान किती आणि त्या मानाने त्यातील दोन माननीय मंत्री आपली चॅनेलीय कर्तव्ये पार पाडत असताना त्यांच्यावर टीका व्हावी? महाराष्ट्र संत सच्चूजी महाराज यांच्या शिकवणुकीचा असा पराभव व्हावा, तोही मराठी मातीत? सच्चूजी महाराज म्हणतात, सदा सकारात्मक विचार करा, नकारात्मक विचारांना थारा देऊ नका! मंत्रिमंडळातील चाळीसांपैकी दोघांनी बाईटस् दिले म्हणून त्यांच्यावर टीका? कुत्रा माणसास चावला ही बातमी नसेल, माणूस कुत्र्यास चावला ह्यास बातमीमूल्य आहे.. पण हे आभासी बाईट्स माननीय मंत्रीगणांपैकी दोघांचे. त्यांनी प्रत्यक्ष चावे घेतल्यासारखा गहजब का माजावा? आणि बाकीच्या अडोतीसांनी कॅमेरा पराङ्मुख राहावे त्यांना अनुल्लेखाने मारावे?

असो. आग तर विझली, काम काज पण सुरळीत चालू झाले. अग्निसुरक्षेच्या चर्चा झाल्या आणि संपल्या. आग काही दररोज लागत नाही, पुढे काय होईल तेव्हा बघू असा मंत्रिमंडळाचा निर्णय व्हायची शक्यता असल्याचे आमच्या कानी आहे.

अर्थात त्या आधी उपमुख्यमंत्री, गृहमंत्री इत्यादींच्या प्रतिक्रिया चॅनेलीय चाव्यांतून सर्वांनी ऐकल्या. त्यातल्या काही मात्र चॅनेलांनी ऐकवल्या नाहीत. त्यातील एका राज्यमंत्र्यांनी, आमच्या टेबलावर जळण्यापुरताही फाईल्स पोहोचू देत नाहीत वरचे मंत्री अशी तक्रार केली तर एका वरिष्ठ मंत्र्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर बाईट दिला, असा वणवा पसरला तर मुख्यमंत्री बदलायला वेळ लागणार नाही!

अशा मतामतांच्या गलबल्यात मूळ घटना तशी विरून गेली. तशी संपत्तीची नासधूस झाली. सरकारी भाषेत जीवित आणि वित्तहानी ही झाली. लोकशाहीत मताची किंमत भले एकच असो सगळयांच्या, प्राणाची किंमत मात्र वेगवेगळी असते इकडे. त्यात लाखांच्या पोशिंद्यांना, म्हणजे कोणत्याच मंत्री महोदयांना कसलीच इजा न झाल्याने तसे फार नुकसान झाले असे म्हणता आले नाही.  तरी देखील या आगीचे कवित्व पुढे कित्येक दिवस सुरू राहिले. कुणी म्हणाले हे डिझास्टर मॅनेजमेंट नाही तर मॅनेजमेन्ट डिझास्टर आहे!

सगळया वादविवादात मात्र एक गोष्ट सपशेल विसरली गेली.. आजवर राज्यावर कमी आपत्ती का आल्या.. आगी लागल्या, वादळे झाली, पूर आणि महापूर आले, भूकंप झाले.. त्यात या लोकनियुक्त पोशिंद्यांपैकी कधीच कुणी जायबंदी झाले नसतील तर त्यांच्या डिझास्टर मॅनेजमेन्ट वर संशय घेणाऱ्यांचीच कीव करायला हवी. कुणी सर्वसामान्यांचा कैवार घेत म्हणेल, काही सामान्य त्या आगीच्या तोंडी भक्ष्य झाले. ते खरेय, पण ती दैवगती. खरेतर मागील जन्मीचे पाप. नुसतेच आगीत होरपळून निघणे नाही, तर त्या पापांमुळेच तर हे या जन्मी सर्वसामान्य राहिले. कुणी संविधानाची साक्ष काढून म्हणेल, सगळया प्राणांची किंमत ही एकच आहे, कदाचित खरे असेल ते. कदाचित राज्यघटनेचा अपमान होईल तसे न म्हटल्यास. पण तसे म्हणाल्यास तो मूळ घटनेचा अवमान होत नाही का? आपल्याकडे ही खास बात आहे. म्हणजे संसदीय प्रथांबद्दल काही बोलले कुणी, किंवा कुणाचा विशेषाधिकार भंग केला तर ते महत्पाप आणि गुन्हाच

समजला जातो. तेच संसदेत मारधाड केली वा गोंधळ घातला तर होत नाही असे काहीच. आमच्या येथे एखाद्या महापुरूषाच्या शिकवणी विरूद्ध वागले तर चालते पण त्याच्याबद्दल चिकित्सक वृत्तीने काही लिहिले तर फट् म्हणता ब्रह्महत्या होऊ शकते. थोडक्यात आहे हे असे आहे. तेव्हा मूळ बाब ही की मंत्रालयास आग लागली, त्यात जान माल का नुकसान हुआ, आणि या आगीची उच्च पातळीवरून चौकशी सुरू आहे!

एकूणच मात्र यामुळे आपल्याला आपत्ती व्यवस्थापनाबद्दल काही एक विचार करावयाची गरज आहे. म्हणजे त्याबद्दल कोणाला आपत्ती असायचे कारण नसावे. एकूण आपत्तींचा आपल्याला त्यामुळे सम्यक आणि विशाल दृष्टीने विचार करावा लागेल. एखाद्या संकट समयानंतर लगेच त्या संकटातून वाचलेल्या वा त्यात अडकलेल्यांबद्दल चर्चा होते. कोणी सहानुभूती दाखवत तर कुणी कोणाला दोष देत काही दिवस कवित्व चालते. चॅनेल्स पुढील संकटापर्यंत मागील संकट पुरवून पुरवून वापरून घेतात. लोक काही दिवसांनंतर सारे विसरून नव्याने कामाला लागतात. आनंद आणि दु:ख समान मानणारे संत शिकवणीनुसार स्थितप्रज्ञ अशी जनता ज्या राज्यकर्त्यास लाभते तिचे भाग्य थोर. तर अशा थोर देशातील थोर जनतेच्या थोर नेत्यांनी या स्थितीचे अत्यंत सूक्ष्मातिसूक्ष्म विश्लेषण केल्याचा अहवाल आमच्या हाती आला आहे. त्यात अत्यंत मूलगामी विचार मांडण्यात आल्याचे आमच्या ध्यानी आले आहे. त्यातील काही महत्त्वाची निरीक्षणे नमूद करीत आहोत.

१.

संकटांचे अस्मानी आणि सुलतानी असे दोन प्रकार असल्याचे म्हटले जाते. एक वर्गीकरण पद्धत म्हणून हे ठीक असेलही. परंतु कोणत्याही संकटामागे एक कार्यकारणभाव असतो. त्यात नैसर्गिक कारणेच महत्त्वाची असतात. उदाहरणार्थ मंत्रालयातील आग. एका मानवी चुकीने

लागली असली ती तरी ती पसरते विज्ञानाच्या नियमांनुसार. तेथे कोणा सुलतानाचे काय चालणार? थोडक्यात अस्मानी हाच संकटाचा एकमेव प्रकार आहे.

२.

सर्व संकटांचा एकूण अंदाज घेणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ मुंबई येथील एका दिवसात सव्वीस जुलै रोजी झालेला अति पाऊस आणि पूरसदृष्य परिस्थिती. असा पाऊस शंभर वर्षात कधी झाला नाही असे वेधशाळा सांगते. किंवा सुनामी घ्या, भूकंप घ्या. अशा आपत्ती कधी कधीच येत असतात. कित्येक जणांच्या पूर्ण आयुष्यभरात त्यांनी अशा संकटांचे तोंडही पाहिले नसावे. साध्या पावसाचे उदाहरण घेऊ. वर्षातील चार महिने पाऊस पडतो. त्या एकशेवीस दिवसांतील फार तर चाळीस दिवस पावसाचे. त्यातील जोरदार वृष्टीचे दिवस चार किंवा पाच. त्यातून अगदी पूर येणे वर्षभरात क्वचितच कधी होत असते. बाकी तीनशे साठ दिवस पूर असतो का? हे सर्वच आपत्तींबाबत खरे आहे. असे असता त्यांचा किती बाऊ करावा याचे तारतम्य ठेवणे गरजेचे आहे.

३.

आपला देश अतिप्रचंड आहे. देशाचा विस्तार पाहिला तर त्यातील किती भूभाग हा संकट ग्रस्त असतो? देशविस्ताराच्या काही शतांश भागात एकावेळी संकट कोसळत असते. याचा अर्थ बाकी कितीतरी भाग हा संकटापासून मुक्तच असतो.

४.

आपल्या देशाची लोकसंख्या ही जगातील दुसऱ्या  क्रमांकावर आहे. त्या प्रमाणात संकटे कोसळणे हे शक्य तर आहेच अाणि ती सांख्यिकीच्या नियमानुसार होणारी गोष्ट आहे. एकावेळी लोकसंख्येचा काही शतांश भाग बाधित असताना उर्वरित जनतेस त्यापासून कोणताही धोका नसतो ही सकारात्मक बाब ध्यानात घेणे जरूरीचे आहे.

५.

जपानचे कौतुक करतात जगभर, भुकंपाच्या सामन्याबद्दल. मान्य अाहे. पण हे त्या चिमटीत मावणाऱ्या देशास शक्य आहे. अापल्यासारख्या खंडप्राय देशात हे घडणे किती अव्यावहारिक आहे. म्हणजे भूकंप प्रतिरोधक सारे एकीकडे आणि झाला भूकंप झालाच दुसरीकडे कुठेतरी.. तर सारा खर्च वाया जायचा. तेव्हा आपल्या देशाचा आकार समजून घेऊनच सारे काही व्यवस्थापन करण्यात आले पाहिजे. आणि ते शक्य नसल्यास ते तसे असल्याचे मान्यच करावयास हवे. नाहीतर आपत्तीने होणाऱ्या नुकसानाहूनही त्याच्या तयारीवर जास्त खर्च व्हायचा.

६.

एकूण या सर्व आपत्ती आणि संकटांच्या व्यवस्थापनाबद्दल त्यामुळे असा निष्कर्ष काढण्यात येत आहे की, जे घडणारे ते टळत नाही हा आपल्या पूर्वजांनी शिकवलेला शहाणपणा टाळून पुढे जाणे म्हणजे उगाच आधीच नाजूक असलेल्या अर्थव्यवस्थेस तुटे पर्यंत ताणणे. आणि जी काही आपत्ती व्यवस्थापनाची तयारी सरकार म्हणून केली जात आहे आजवर ती सर्वात कॉस्ट इफेक्टिव्ह मानण्यात आली पाहिजे.

आमच्या हाती ह्या अहवालाची गोपनीय माहिती आल्यानंतर आमचे डोळे खाडकन् उघडले. कोणतेही सरकार असो, असा मूलभूत मूलगामी विचार करणाऱ्यांमुळेच आपल्याला खरा रस्ता दिसू लागतो. तसा आम्हालाही दिसला.

संत मंडळी सांगून गेलीत, ठेविले अनंते तैसेचि रहावे .. आणि किती एक थोर मोठे सांगून गेलेत, घडणारे टाळता येत नाही. या सर्वांचा अर्थ काय?

दैवगतीपुढे कोणाचे काय चालणार ही आमची श्रद्धा आहे. विधिलिखितापुढे आम्ही नतमस्तक असतो. थौडक्यात आपत्ती व्यवथापन आपल्या संस्कृती विरोधातच आहे हे ध्यानात आले आहे आमच्या. तेव्हा डिझास्टर मॅनेजमेंटच्या नावाखाली विधिलिखितालाच आपण आव्हान देणार का हा खरा प्रश्न आहे. एकूण आपत्ती व्यवस्थापनावरच आम्हाला आता आपत्ती आहे.

एका मंत्रालयाच्या आगीने आम्हाला हा साक्षात्कार घडवला. आपापले सुलतान लोकशाही व्यवस्थेत आपणच निवडून पाठवतो तिकडे. मग त्या संकटांना सुलतानी आपत्ती म्हणून स्वतःसच बोल लावून घ्यावा का आपण? लोकशाहीच्या मंदिरानेच आमचे डोळे असे उघडलेत. आता 'डिझास्टर मॅनेजमेंट' की 'मॅनेजमेंट डिझास्टर' सारखा शब्दच्छल नको. संकटांना एक ग्लोबल परिमाण लावले की त्याची तीव्रता कमी होतेच.. हे एक जीवनशिक्षण.. त्याचा अर्थ समजून घेतला तरच त्या मंत्रालयीन आगीतल्या अपघात ग्रस्तांच्या वेदनांचे चीज होईल.

# त्यांच्या आध्यात्मिक गप्पा

श्री.मधुकर मधुसूदन शिवलकर आणि त्यांचे स्नेही श्री.रामकृष्ण राजाराम राजे यांचे मेतकूट छान जमते. हल्ली भेटायला वेळ होत नाही त्यांना पण तरी कधी भेटले तर आध्यात्मिक गप्पांना खंड पडत नाही. आणि नेहमी भेट न होण्यास कारण हेच, राजेंचे निर्गुण स्वामी नि शिवलकरांचे बेलसरे गुरूजी यांचे आश्रम शहराच्या दोन टोकांना आहेत. दोघांचा बराचसा वेळ आपापल्या गुरूंची सेवा नि भक्ती करण्यात जातो. त्यात त्यांना वेळ कसला मिळतोय? त्यांचे गुरू एक असते तर?

पण गुरू आपले शिष्य स्वतः शोधतो म्हणे. अगदी शिष्यासाठी व्याकूळ असतो गुरू म्हणतात. तसा त्यांच्या गुरूंनी त्यांचा शोध घेतला नि गुरू वेगवेगळे म्हणून त्यांची भेट जरा दुर्मिळ झाली इतकेच. तरीही भेट झाली की आध्यात्मिक आनंदाच्या डोहात दोघेही मनसोक्त डुंबतात. त्यांच्या परमार्थ चिंतनात वेगवेगळे विषय येत राहतात आणि त्या पारलौकिक आनंदात दोघांचे चेहरे उजळून निघतात. त्या चर्चा साधारणपणे आपापल्या गुरूने दिलेल्या ज्ञानामृताबद्दल असतात. त्यांची  निरूपणे नि सत्संग याबद्दल असतात. राजेंची भाषा याबाबतीत भारदस्त, तर शिवलकर साध्या भाषेचे पाईक. अर्थात शिवलकरांना तशी भारदस्त, कठीण शब्दप्रचुर भाषा येत नाही हे मुख्य कारण.. पण ते कुणाला सांगत नाहीत ते! तर मितभाषी असल्यासारखे काही वाक्ये बोलून गप्प ऐकत राहतात. अर्थात राजेंच्या रसवंतीपुढे त्यांना बोलता किती आले असते हा ही प्रश्नच आहे!

गुरूपौर्णिमा झाली की दोघे एक दिवस ठरवून भेटतातच. म्हणजे आध्यात्मिक देवाणघेवाण करून दोघेही एकमेकांची उन्नती .. राजेंच्या शब्दात उन्नयन .. करून घेण्यासाठी. तसे या वर्षी देखील भेटले ते. या वैचारिक आदानप्रदानात व्यत्यय नको म्हणून दोघे घरच्या कोणासही बरोबर न घेता भेटतात. वार्षिक शिरस्ताच आहे तो. तो एखाद्या फकिराने मशिदीतला नमाज चुकवू नये इतक्या नियमितपणे पाळला जातो. तसे या वर्षीही भेटले ते एका मठाच्या आवारात. या वर्षी मात्र जरा पंधरा दिवस उशीर झाला. म्हणजे राजेंनाच जरा नव्हते बरे म्हणून. एरव्ही गुरूपौर्णिमा झाली की लगेच त्यांची भेट ठरलेली. सिद्धेश्वर स्वामींचा मठ दोघांना जवळ पडतो. ऐसपैस नि बसायला मुबलक जागा. त्यामुळे सिद्धेश्वर स्वामी दोघांचेही गुरू नसले तरी या पवित्र वास्तूत दोघांना बरे वाटते. शेवटी सारेच सिद्ध पुरूष  महान आणि प्रेरणादायी हे दोघांचेही मत आहे.

शेवटी राजे थोडे बरे झाले नि भेटीस आले.. आले ते ते धापा टाकत.. खोकत.

"काय तब्येत बरी की नाही आता..?"

"तब्येतीचे काय हो.. ती होईल ठीक. पण काही खरं नाही या जगताचं.. जगबुडी होणार .. तुम्हाला सांगतो शिवलकर, तुमचे नि माझे स्वामी आहेत म्हणून जगबुडीपासून जगतास संरक्षण कवच लाभले आहे. नाहीतर काही खरे नव्हते या दुनियेचे .."

"राजेसाहेब, तुम्ही स्वतःस विसरू नका. असे शिष्य आहेत म्हणून गुरूंची आध्यात्मिक श्रद्धा अविचल राहते!"

"खरेच म्हणताय? अहो, या भवसागरात आपण म्हणजे किडामुंगीसारखे! आपले उन्नयन केले ते आपल्या स्वामीजींनी. नाहीतर जगत सागरातल्या बुडत्या नौकेत कसे तरलो असतो आपण! पण माझा सात्विक संताप झाला ते कारण ऐका .. अहो, तो तिरपुडे.."

"ना.ना.?"

"हो ना, तोच. नारायण नागफणे म्हणजे खरेतर नामधारी नालायक.. क्षुद्र कीडा. भाषेबद्दल क्षमस्व पण त्याच्याबद्दल वापरण्यालायक शब्दच नाहीत ठेवले त्याने.. तर ना. ना. तिरपुडे म्हणाला, स्वामी नि बुवा ही सारी अंधश्रध्दा आहे म्हणे! शिव शिव! आपल्या पुण्याच्या बळावर विश्व तरून आहे नि हा गमजा मारत फिरतोय."

"खरंय, हे नास्तिक माजलेत ते आपल्यासारख्यांच्या जिवावर .."

"आपले पुण्य आणि त्याच्या बळावर मिजास! तुम्हाला सांगतो शिवलकर, स्वामींनी या वेळच्या प्रवचनात सगळया नास्तिकांची अशी भादरलीय म्हणता. कुणी ऐकेल तर ढुंगणाला पाय लावून पळ काढेल. ते जरा असांसदिय शब्द वापरले म्हणून क्षमस्व, पण हे नास्तिक म्हणजे या धरतीतलावरचे ओझे आहेत हो. स्वामी स्पष्टच म्हणाले, ह्या दुनियेत हा सुष्ट आणि दुष्ट यांचा कायम कठोर संघर्ष सुरू असतो. हे नास्तिक नापाक दुष्ट आणि आपल्या सारखे भक्तीमार्गी सुष्ट. आपल्या पुण्याच्या पुंजीवर डल्ला मारून जगताहेत सारे. सुष्टांचे पारडे जड होतेय ते आपल्यामुळेच शिवलकर. आपण नसतो तर काही खरे नाही जगाचे."

"खरंय राजेसाहेब, अहो श्रद्धेवर जग तरते नि तगते."

"या मूठभर पाखंडांना कुणी अधिकार दिला अंधश्रद्धा वगैरे ठरवण्याचा? साधी सत्यनारायणाची पूजा. त्यात म्हणे यांना काही आक्षेप आहेत. तुमचे आक्षेप ठेवा तुमच्याकडे. आणि अशा पाखंड्यांमुळेच येतात प्रलय नि भूकंप. मी नाही, स्वामीच म्हणतात असे."

"आमचे गुरुजी पण तेच सांगत असतात."

"तुम्हाला सांगू शिवलकर, सारे सिद्ध पुरूष एकच शिकवण देतात हो. भगवंतास शरण जाणे. त्यासाठी काहीही करावे लागले तरी ते ह्या मनुष्य प्राण्याने केलेच पाहिजे नाही का? माझे

सांगू? मला तर ही माझी नैतिक जबाबदारी वाटते शिवलकर. स्वामीभक्ती आणि पूजा अर्चा. मी यावेळी तब्बल दहा ग्रॅम सोने दान केले हो आश्रमास. स्वामी माझ्या भक्तीवर खूश झाले. आध्यात्मिक उन्नयन हवे तर भौतिक त्याग करावयास हवाच हो की नाही?"

"राजेसाहेब, खरंय तुमचे. आम्ही आमच्या बेलसरे गुरुजींना या वेळी सिंहासन दिले गुरूपौर्णिमेस. त्यास सोन्याचा पत्रा आहे. आपल्या गुरूंसाठी इतके तर करावयास हवेच."

"छान! ही कल्पना सुरेख आहे. स्वामी आणि गुरूजी कनकासनावरच शोभतात. कितीही आपण म्हटले ना की सोने नि चांदी यांना अध्यात्मात किंमत नाही तरीही दुनियादारी बघावीच लागते. नाहीतर गुरू काय मृगाजिनावर बसणारेत? नाही म्हणजे बसावे त्यांनी, पण तेही कनकासनावर अंथरून.. काय खरे की नाही शिवलकर?"

"खरेय राजेसाहेब."

"काय आहे ना, आता आपण दोघेही अध्यात्माच्या अशा पायरीवर पोहोचलो आहोत ना .."

"सारी गुरूची कृपा साहेब."

"खरेय. गुरू बिन कौन बतावे वाट .. तुम्हाला सांगतो या करंट्यांना कोण सांगणार आध्यात्मिक आनंदाची महती. सकाळी उठून शूचिर्भूत होऊन देवादिकांची सेवा करण्यात जी दिवसभराची ऊर्जा मिळते त्याचा स्वर्गीय आनंद या नास्तिकांस नाही समजावयाचा. अहो, पूर्वीचेच सारे योग्य होते. आपले पूर्वज कसे जातीपाती पाळत त्यामुळे त्यांची नैतिक उन्नती होत होती. आज जिकडे पहावे तिकडे नैतिक ऱ्हास दिसतोय याला कारण संस्कृतीहीनता. स्वामी म्हणाले ते हेच. समाजाची घडी शतकानुशतके टिकवून धरलेली या व्यवस्थेने, ती मोडली. आता आपल्या श्रद्धांवर संशय घेताहेत!"

"खरेय राजेसाहेब. गुरुजी पण हेच सांगतात. गुरुजी तर म्हणाले त्यादिवशी, असे होत राहिले तर संस्कृती धोक्यात येईल एक दिवस. अर्थात गुरुजी आहेतच.."

"होय शिवलकर, अहो यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति .. आपले स्वामी नि गुरुजी म्हणूनच तर अवतार घेऊन आलेत पृथ्वीवर. संस्कृती रक्षण महत्त्वाचे. धर्मरक्षण महत्त्वाचे. आपल्या श्रद्धांचे रक्षण महत्त्वाचे. मी तर म्हणतो, मध्ये ते कुणा पाखंड्यांना देवाघरी पाठवले ना ते अगदी धर्मकृत्य हो. अहो असली विखारी पिलावळ म्हणजे भुईला भार तर खराच, पण आपल्याला ही पृथ्वी वाचवायची असेल तर, एकतर आपल्या भक्तीच्या कक्षा वाढवायला हव्यात नि अशांची संख्या कमी करायला हवी!"

"हो ना, देव दयाळू आहे हे खरेच."

"आज आलो ना तर किती अडथळे. अहो आपला हा शिरस्ता मोडायचा नाही म्हणजे नाही. आध्यात्मिक चर्चा आपल्या उन्नतीसाठी होणे गरजेचे आहे. शिवलकर. अहो, सकाळी सकाळी आमचा तो ड्रायव्हर दत्तू .. त्याचा फोन आला. त्याच्या पोराला बरे नाही म्हणे. रविवार आज. त्याची सुट्टी असते. पण म्हटले आपले हे चर्चासत्र जास्त महत्त्वाचे आहे. मी म्हटले त्याला, घरी सोड पोराला, तापबिप काय निघून जातो, ड्युटी महत्त्वाची. आला झक्कत. या लोकांशी असेच वागायला हवे.. त्यात परत भेटला तो ना.ना.. म्हणून उशीर झाला. तुम्हाला सांगतो या वर्षी स्वामींच्या उत्सवासाठी आॅफिसातून चांगली आठ दिवसांची रजा घेतली. आध्यात्मिक तत्वचर्चा महत्त्वाची. स्वामींच्या चरणी तल्लीन होणे महत्वाचे. ड्युटी काय होत राहते, हो की नाही?"

"अहो राजेसाहेब, आमच्याकडे पण तसेच चित्र हो. कामवाल्या वेळेवर येत नाहीत. आल्यात तर कामे धड नाहीत. तरी बरे पगार कापतो आम्ही त्यांचे कामात चुका झाल्यातर. घरोघरी मातीच्याच चुली म्हणायच्या आणि काय!"

"अहो शिवलकर, या वेळीस स्वामींनी नवीन मंत्र दिला. एकतर आपल्यासारखे उच्च स्तरावरील भक्त आणि बाकीचे य:कश्चित सामान्य यांची तुलनाच होऊ नाही शकत. कुणी कितीही म्हणा, मी पणा सोडा. पण एका विशिष्ट पारमार्थिक पातळीवर जिथे आपण पोहोचलोयत ना आपल्या भक्ती मार्गातून तिथे मी पणा सोडून कसा चालेल. मी तर म्हणतो तो अजून विकसित केला पाहिजे. बाकी जुन्या संतांच्या गोष्टी वेगळया म्हणा. त्यांना आपल्यासारखी दुनियादारी नव्हती बघायची. आपल्याला दोन्ही करायचेय तर.."

"खरंय तुमचे राजेसाहेब."

"बाकी संतांचे काय, एकतर ते सारे पूर्वीच्या दिवसांत होऊन गेले. त्यांना जास्त काही काम नसणार. आजच्या स्वामी नि बुवांना सगळेच बघावे लागते. त्यातल्या त्यात आपल्यासारखे भक्तलोक आहेत म्हणून बरेय. पण म्हणून ती जुनी शिकवण कालबाह्य झाली म्हणा. जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले.. तुकारामाने सांगितले असेल तेव्हा.. पण तेव्हा लोकशाहीतले कल्याणकारी राज्य नव्हते. आज सरकार आहे लोकनियुक्त. त्याचे काम आहे, रंजल्या गांजल्यांना आपुले म्हणायचे. आपण नव्हे! आपण फक्त आत्मोन्नती साधण्यासाठी स्वामींची सेवा करायची! आणि पूजा अर्चा, भजनात नि नामस्मरणात काल व्यतीत करायचा. अहो तुम्हाला आमच्या होमहवनाबद्दल सांगणे राहूनच गेले की.."

"घरी तुमच्या?"

"सध्या घरी नाही. पण लवकरच शांतियज्ञही करणार आहे घरात. पण गुरूपूजा म्हणून आम्ही यज्ञ केला. हवन केले. तुम्हाला सांगतो, हवनाचा धूर सगळीकडे पसरला. अगदी दारे खिडक्या बंद करून तो धूर छाती भरून घेतला. स्वामींचा प्रसाद जणू."

"पण तुमची तब्येत तर आता बरी आहे ना? खोकला होता ना? नाही म्हणजे आपली भेट आता पुढे ढकलली गेली म्हणून ..?"

"छे हो! स्वामी तारी त्यास कोण मारी? तोच दमा. त्या पूजेनंतर उसळला होता. आता बऱ्यापैकी बरा आहे. डॉक्टर म्हणे, त्या धुराने झाला तो. पण असल्या पवित्र धुराने दमा कशाला होतोय! डॉक्टरला काय, काही कारण दिसले नाही तर दिला दोष त्या धुराला. मी तर म्हणतो, छातीत पवित्र धूर गेल्याने तर दमा बळावला नाही अजून."

"खरंय तुमचे राजेसाहेब, हे असले दुनियेतले कायदेकानू आपल्यासारख्या भक्तांना नाही लागू होत. आपण आपल्या गुरूंच्या पुण्याईवर समुद्र तरून जाऊ .."

"होय, पर्वत ओलांडून जाऊ .. पंगु लंघयते गिरी म्हणतात तसे. स्वामींची कृपा असेल तर.. का नाही होणार?"

"तुम्हाला सांगतो, आता आपली भेट झाली ना की वर्षभरचा आध्यात्मिक प्रसाद मिळाल्यासारखे वाटते."

"हो शिवलकर. आपले स्वामी नि गुरूजी दोघांच्या तात्विक विचारांचे आदानप्रदान म्हणजे एक वैचारिक घुसळण आहे आपल्यासाठी. त्यातून एक नवनीतासारखी शिकवण घ्यावी आणि आपली उन्नती साधून घ्यावी. बाकी जगाच्या नि जगायच्या चिंता संसारी गृहस्थास थोडीच चुकल्या आहेत?"

"मला खूपदा वाटते राजे साहेब, आपल्या महाराजांनी आपल्याला ही उन्नतीची वाट नसती दाखवली तर?"

"खरंय शिवलकर, पूर्व जन्मीचे पुण्य म्हणावे आपले. असे गुरू मिळण्यास नशीब थोर असावे लागते. आणि आपल्या गुरूंना आपल्यासारखे शिष्य मिळण्यास ही."

"खरे बोललात राजे साहेब. काही असो, या बळावर पुढील जन्मीची सोय लावून घेणे महत्त्वाचे."

"अगदी योग्य. आपली वेवलेंथ जुळते बघा शिवलकर."

"आता यावर्षीची गुरूपौर्णिमा गेली. पुढच्या महिन्यात मोठा सत्संग आहे आमच्या आश्रमात. अहो, स्वामींनी मागच्या वर्षी चांगली घड्याळे काढून दिली भक्तांना प्रसाद म्हणून. म्हणजे अगदी रीतसर पावती फाडून स्वामींचरणी कोणी काही दिले की स्वामी नुसता हवेत हात फिरवून काढतात प्रसाद. मोठमोठया उद्योगपतींना मिळालीत ती प्रसादाची घड्याळे. बाकीच्यांपैकी काहींना स्वामींची लाॅकेट्स नि अगदीच कोणी गरीब असला तर त्याला स्वामींचा अंगारा तरी नक्कीच. स्वामींना सारे भक्त सारखेच. सर्वांना प्रसाद मिळणार म्हणजे मिळणारच!"

"आमचे गुरुजी थोडे वेगळे आहेत या बाबतीत. खडे वाटतात प्रसाद म्हणून. वाटतात म्हणजे फेकून मारतात. तो जेवढ्या जोरात लागेल तेवढे पुण्य जास्त."

"तुम्हाला सांगतो शिवलकर, या महान पुरूषांचे सारेच वेगळे. त्यांच्या मनात काय असेल सांगता नाही येत.."

"होय राजेसाहेब, ते दोन खडे मी सांभाळून ठेवलेत देव्हाऱ्यात पूजेला."

"योग्य. अगदी योग्य केलंत. मी देखील मला मिळालेले घड्याळ वापरत नाही. अहो, स्वामींचे घड्याळ ते, त्याचे काटे फिरत नाहीत. पण बंद नाही बरे ते, स्वामी म्हणतात, एक एक तपानंतर किंवा पुण्यसंचयानंतर तो सेकंद काटा हलेल कधीतरी. रोज उठून पाहतो मी. आज तुम्हाला सांगतो, थोडा हलला तो काटा असे वाटतेय. अर्धा सेकंद का होईना."

"खरेय, पुण्य असेच साचायचे, थेंबे थेंबे आणि काय!"

"अहो, ही आध्यात्मिक वाट सापडली म्हणून बरे, नाहीतर आपणही सर्वसामान्यांसारखे चरकात पिळून निघालो असतो. तरीही संसारिक विवंचना काय सुटतात पाठच्या.. मोठा आमचा.."

"लागला नोकरीस?"

"हो ना शेवटी एकदाचा. स्वामींना साकडे घातले, त्याच्या वरच्या दोन साहेबांचे हात ओले केले.. अहो सरकारी नोकरी अशी सहज कसली मिळतेय. पण आता जन्मभर बसून खाईल. वरकड कमाईच पगारापेक्षा जास्त हो तिथे. पण स्वामींच्या आशीर्वादानेच मिळाला तो जाॅब."

"स्वामींचा प्रसाद म्हणायचा!"

"खरेच. म्हणून तर तो गुरूपुजेचा यज्ञ करवला. खर्च झाला थोडा पण नोकरीतून येईल भरून. बस, स्वामींचा आशीर्वादाचा हात पाठीशी हवा शिवलकर."

"खरेय, आमच्या मोनीचे लग्न जुळतेयसे वाटतेय. मुलगा तसा जास्त शिकला नाही. घरचे बरेय. तसा हिला पसंत नाही पण गुरुजी म्हणताहेत, पत्रिका जुळतेय, विवाहोत्तर भाग्योदय आहे. आमची मोनी शिकलीय.. चांगली पोस्ट ग्रॅज्युएट. मुलगा बारावी फेल म्हणून अडून बसलीय. पण गुरूजींच्या दूरच्या नात्यातला आहे. गुरुजी म्हणतात म्हणजे ऐकायला हवे! सध्या ती ऐकत नाही पण.."

"जबरदस्ती करा शिवलकर. गुरू इच्छेबाहेर जाऊ नका. त्यात त्यांच्या नात्यातला. पुस्तकी शिक्षणाहून हे महत्त्वाचे .. टाका उरकून."

"असे म्हणता? मी विचारात पडलेलो पण तुम्ही म्हणता तसेच करतो. पोरीला काय कळतेय. बाकी जनरीत म्हणून सारे करू पण मोनी मानेल तर ना. मी गुरुजींच्या पायी घालतो तिला यावेळी. तेच पार पाडतील सारे."

"एक एक विवंचना मागे नाहीत का? पण शिवलकर, आपल्या मागे सिद्ध पुरूष उभे आहेत म्हणून एक ठीक. अहो देव कुणाच्या रूपाने मागे उभा राहिल सांगता येत नाही. त्यात आपण अध्यात्म कोळून प्यायलेलो. तरी पण आपल्या काळज्या संपतात थोडीच. आता पोरगा नोकरीला

लागला तर लग्नाची काळजी .. पण आता चिंता नाही. सरकारी नोकरी म्हणजे रग्गड हुंडा. स्वामींची कृपा झाली तर मिळेल चांगले स्थळ. त्या चांदोरकराच्या मुलाने लव्हमॅरेज केले म्हणे. म्हणजे हुंडा शून्य. मी म्हणतो आपल्या पूर्वजांनी पाडल्यात प्रथा त्या मोडाव्यात कशाला? अहो, त्या मागे त्यांचा गहन विचार आणि शास्त्रीय बैठक असते. उगाच आजच्या काळात अशा प्रथा मोडायच्या म्हणजे काय? संस्कृती म्हणून काही आहे की नाही?"

"खरंय तुमचे. मोनी मात्र अडून बसलीय, हुंडा घेणाऱ्याशी लग्न नाही म्हणे! मुलींना शिकवले ना की अशा डोक्यावर बसतात बघा. आपल्या वेळचे चांगले होते. अशा मुली हाताबाहेर नि आज्ञेबाहेर जात नव्हत्या."

"कलियुग शिवलकर, कलियुग! पण माझी श्रद्धा आहे, परत तो आपल्या धर्माचा सुवर्णकाळ येईल. सारे आध्यात्मिक आनंदात न्हाऊन निघतील. जुनी संस्कृती पुनरूज्जीवित होईल. स्वामींची देखील हीच धारणा आहे. प्रवचनात स्वामी स्पष्टच सांगतात हे. सारे संमोहित होऊन ऐकतात."

"ऐकणारच. तुमचे निर्गुणस्वामी म्हणजे तेज:पुंज. त्यांच्याकडे पाहून कुणालाही वाटेल त्यांचे अनुकरण करावे. जेवढे आपण मनावर बिंबवू ना तेवढी प्रगती साधता येईल."

"खरंय, सारे काही प्रगती, उन्नती आणि उन्नयन याकरताच तर आहे. आपल्यासारखे डेडिकेटेड भक्त आहेत म्हणून.. शेवटी काय आहे ना की त्या देवापुढे नतमस्तक व्हायचे तर असे स्वामी हवेत. ते आईबद्दल म्हणतात ना, देव सगळीकडे कसा जाणार म्हणून त्याने हे स्वामी नि साधू बनवले."

"खरंय राजेसाहेब. या वर्षीची गुरूपौर्णिमा आणि गुरूपादपूजा पार पडली. आता एक वर्षे .."

"स्वामी चरणी लीन.. दुसरे काही नाही .. चला. निघायला हवे. आमचा दत्तू थांबलाय. थांबला म्हणजे मी थांबवला. अरे, मागच्या महिन्यात दोन सुट्ट्या घेतल्यात. पगार कापला तर

लगेच तोंडे वाकडी होतात यांची. पोरगा सारखा सारखा आजारी पडतो म्हणे. झेपत नाही तर कशाला पोरं पैदा करावीत.. असू देत. आपल्याला काय. आपण आपली गुरूभक्ती करत रहावी आणि काय?"

"चला, निघू राजेसाहेब, आता पुन्हा भेट.."

"बहुधा पुढच्या पौर्णिमेनंतर! चला निघू."

"प्रकृती सांभाळून रहा.. खोकताहात चांगलेच."

"स्वामींच्या कृपेने सारे ठीक होईल हो. अंगारा लावतोय रोज. प्रार्थना सुरू आहे.."

"म्हणजे प्रश्नच नाही. चला निघूच या.."

# अखिल विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी अर्ज

अखिल विश्व मराठी साहित्य संमेलन इथियोपियातील किंवीवाडूंक खुर्द मराठी मंडळ (पाटील विभाग) यांच्या विद्यमाने संपन्न होणार आहे. आयोजक व स्वागताध्यक्ष नामदार श्री.अखिलराव विश्वशब्दे भोरे-पाटील असतील. त्या निमित्ताने या अखिल विश्व मराठी साहित्य संमेलन इ.स.२०५० च्या अध्यक्षपदासाठी विहित नमुन्यात अर्ज मागवण्यात येत आहेत.

(महत्त्वाची सूचना : अर्ज भरताना सूचनांचे आणि अटींचे पालन करावे.)

१.पूर्ण (खरे) नाव

२.टोपण नाव/नावे

३.वय

४.पत्ता

५.जात, धर्म

६.अवगत भाषा

७.वजन ... किलो ... ग्रॅम ... मि.ग्रॅ.

८.खालील मुद्द्यांवरील भूमिका..

(प्रत्येक मुद्दयावर पन्नास शब्दांत मांडावी)

अ. सीमा प्रश्न, महाराष्ट्रीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय

ब. मराठी भाषा व मराठी शाळा : तरतील की बुडतील?

क.सरकारी पैशाचा संमेलनात वापर

ड. राजकारण्यांचा संमेलनात सहभाग

इ. जात, धर्म, गाव इ.ची संमेलनात भूमिका

फ. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक व्हावी?

ग. महत्त्वाच्या मुद्द्यांवर साहित्यिक मौन कसे पाळावे?

९. आजवर मिळालेले पुरस्कार, त्यांच्या संभाव्य कारणांसह

१०. आजवर हुकलेले पुरस्कार, त्यांच्या संभाव्य कारणांसह

११. मी अध्यक्ष बनू इच्छित आहे कारण... (पन्नास  शब्दात लिहा)

१२.आपण अध्यक्ष बनण्यास पात्र कसे आहात.. (पाच शब्दात लिहा)

अर्ज भरण्यासाठी अटी व सूचना:

अ.

टोपण नाव अथवा नावे आपलीच असल्याचे नोटराइज्ड प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

ब.

पत्त्यात आपल्या देशाचा उल्लेख आवश्यक.

क.

कमीत कमी वय ८० वर्षे. जन्माचा दाखला आवश्यक.

ड.

वजन या रकान्यात साहित्याचे वजन अपेक्षित आहे, साहित्यिकाचे नव्हे. प्रकाशित एकूण साहित्याचे वजन रद्दीच्या काट्यावर कमीत कमी १० किलो असावे. सदर काटा वजन आणि मापे विभागाने प्रमाणित केला असल्याचे प्रमाणपत्र प्रमाणीकरण विभाग यांचेकडून प्रमाणित स्वरूपात आवश्यक.

इ.

अवगत भाषांत मराठीचे जुजबी ज्ञान आवश्यक. तसे स्वस्वाक्षरांकित प्रमाणपत्र इंग्रजी अथवा हिंदी भाषेत सोबत जोडावे.

फ.

पृथ्वीच्या उपग्रहा व्यतिरिक्त अन्य परग्रहावरील अर्ज नाकारण्यात येतील.

ग.

निवडलेल्या उमेदवारास चष्मा (अथवा चष्मे) श्रवणयंत्र (अथवा जरूर असल्यास यंत्रे), टेकूची काठी (अथवा काठ्या), व्हिल्चेयर आणि अन्य औषधे वा अन्य आरोग्यविषयक यंत्र सामुग्री इ.चा खर्च स्वत: करावा लागेल. वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्याचे बंधन आयोजकांवर राहणार नाही.

ह.

(वयोमानानुसार) लिहिता वाचता न येणाऱ्या  उमेदवारास स्वत:चा लेखनिक/वाचनिक बरोबर स्वखर्चाने आणता येईल. तसे शक्य नसल्यास लेखनिक/वाचनिक पुरवण्यात येईल. लेखनिक वा वाचनिकांच्या भाषा कौशल्याची कोणतीही जबाबदारी आयोजकांवर असणार नाही.

य.

परभाषिकांसाठी मराठीचे क्रॅश कोर्स उपलब्ध. कोर्स दरम्यान उमेदवार क्रॅश झाल्यास आयोजक जबाबदार राहणार नाहीत.

ज.

साहित्य याचा अर्थ लिखाण असा घ्यावा. नाभिक समाजातील एक वरिष्ठ श्री.बाजीराव गोविंद पवार यांनी मागील वर्षी अर्ज करताना आपल्याकडील हत्यारांना साहित्य मानावे असे प्रतिपादन केले होते. सन्माननीय सुप्रीम कोर्टाने त्यांचा हा युक्तिवाद फेटाळून लावला होता. याची नोंद अर्ज करणाऱ्या साहित्यिकांनी कृपया घ्यावी.

क.

सीमा प्रश्न, राजकीय सहभाग अथवा हस्तक्षेप, राज्याचे आर्थिक सहाय्य, भाषेचे इतर प्रश्न इत्यादी विषयांवर लवचिक भूमिका घेता येणे आवश्यक. पाठीच्या कण्याच्या लवचिकतेची हाडवैद्यांकडून तपासणी करण्यात येईल. त्यासाठीचा लागणारा खर्च उमेदवारास करावा लागेल. वयोमानानुसार पाठीतून आधीच वाकलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

ल.

आपले लिखाण वाचलेल्या किमान ५० वाचकांची पत्ता व सही निशी पत्रे जोडणे आवश्यक आहे. हे ५० वाचक लेखकाच्या घरातील व नात्यातील नसावेत.

म.

आफ्रिकन देशातील संसर्गजन्य रोगांचे लशीकरण घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक. आरोग्यविमा उतरवलेल्यांस प्राधान्य दिले जाईल.

न.

निवडणुकांचा कार्यक्रम लवकरच जाहीर होईल. इच्छुकांनी निवडणूक लढवण्याची तयारी असल्याचे व तद् अनुषंगाने येणाऱ्या अन्य सर्व बाबींस तयार असल्याचे प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक असेल.

प.

वरील बाबींस अधीन राहून उमेदवार निवडून आल्यास प्रथम तीन उमेदवारांची राजकीय भूमिकेबद्दलची मुलाखत फेरी घेण्यात येईल. त्यावरून अंतिम निवड घोषित होईल.

अर्ज पाठवण्याची अंतिम तारीख :

ही जाहिरात प्रकाशित झाल्यापासून दहा दिवसांच्या आत. पूर्ण भरलेले व स्वाक्षरी केलेले अर्ज कार्यालयीन वेळेत मंडळाच्या इथियोपिया येथील मुख्यालयात व्यक्तिश: जमा करावेत. उशीरा दाखल झालेल्या व अपूर्ण अर्जांचा विचार केला जाणार नाही.

वि. सू.

आपला अर्ज जमा करताना त्याची पावती जरूर घ्यावी व जपून ठेवावी. त्यावरील क्रमांकांचा लकी ड्रॉ संमेलनात काढण्यात येईल. निवडलेल्या लकी नंबरास खालील बक्षिसे देण्यात येतील

प्रथम क्रमांक : नामिबिया देशाची सर्व खर्च समाविष्ट सहल. (अटी लागू)

द्वितीय क्रमांक: रवांडा देशात 'हाॅटेल रवांडा इन' मध्ये दोघांना दुपारच्या जेवणाची कुपन्स

तृतीय क्रमांक : 'ग्वाटेमालातील आदिवासी जीवन' हे कुं. टुं. उडांबे लिखित पुस्तक

उत्तेजनार्थ बक्षिसे(२) : खास आफ्रिकन मुंगी आणि झुरळ चटणी मिक्स गिफ्ट हँपर्स.

## 'मुरलीतनय' लाळघोटेंचे भाषण

(साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपद निवडणुकीच्या एका उमेदवाराचे भाषण)

निवडणूक म्हटली म्हणजे सारे काही आलेच!

निवडणूक भले लोकशाहीचा पाया असो .. पण निवडणूक म्हणजे माझी रेषा तुझ्याहून मोठी.. किती नि कशी हे दाखवणे! किंवा खरेतर दुसऱ्याची रेषा आपल्याहून लहान कशी हे सिद्ध करणे! मी तुमच्याहून का नि कसा लायक .. किंवा तुम्ही का किंवा कसे माझ्याहून ना-लायक ते दाखवणे. मग त्यात डावपेच आले.. छक्केपंजे आले.. सत्यासत्यतेची थोडीफार सरमिसळ आली! प्रचाराचे रान पेटवणे आले! पटवून देणे आले. आश्वासने आली! मतदार कोण ते पाहून शब्दांची पेरणी आली नि मतदानोत्तर त्या मतांची कापणीही आली. तेव्हा कसलीही असली तरी शेवटी निवडणूक ती निवडणूकच! तर साहित्य संमेलनाची निवडणूक तरी का अपवाद असावी?

पण असे असले तरी आजवर कुणी उमेदवारांना राजकीय नेत्याच्या थाटात प्रचारकी भाषणे ठोकताना नाही पाहिले.. पण आजच्या प्रागतिक महाराष्ट्राच्या प्रागतिक वातावरणात तो दिवस फार दूर नाही. भविष्यात येऊ घातलेल्या एखाद्या साहित्यिक निवडणुकीत असली भाषणे होणारच नाहीत असे नाही!

तेव्हा एका आगामी निवडणुकीतील एक उमेदवार साहित्यिक.. नव्हे .. साहित्यिक उमेदवार प्रा. श्री. जा.मु. तथा जानकीदास मुरलीधर लाळघोटे ऊर्फ मुरलीतनय यांच्या प्रचाराचे हे भाषण! आजवर प्रथा अध्यक्षपदावरून (वेळ उरल्यास) भाषण करण्याची आहे. पण पुढे मागे सारेच उमेदवार असा प्रचाराचा धुरळा उडवतील! आणि आपली मौलिक विचार पसरवणाऱ्या

भाषणाची हौस आधीच भागवून घेतील. मग प्रत्यक्ष संमेलनात व्यासपीठावरच्या नेतेगणांच्य भाऊगर्दीत आपल्याला वेळ मिळाला नाही किंवा खरेतर दिला गेला नाही तरी बेहत्तर!

*****

माझ्या प्रिय रसिक वाचक मतदार बंधू भगिनींनो,

तुम्हा सर्वांचे स्वागत आणि सर्वांना नमस्कार!

मी कोण ते तुम्हाला नव्याने सांगायची गरज नाही. केशवसुत म्हणून गेले, आम्ही कोण म्हणून काय पुसता.. आम्ही असू लाडके! कवीच नव्हेत तर आम्ही लेखक लोक ही देवाचे लाडके असतो हे खरे!

तसा मी ही रसिक दरबारात साहित्य खाणींच्या गोणी वाहणारा एक हमाल आहे. देवाच्या लाडक्यांनाच असली कामे मिळतात हेच कवि केशवसुत सांगून गेलेत! तर मी या साहित्य संमेलनीय निवडणुकीस उभा आहे. माझ्यापुढे तुम्ही इतर उमेदवारांना ओळखत असाल याची शक्यता कमीच! अाणि माझी ओळख नव्याने करून द्यावी असेही नाही. तेव्हा गेल्या काही दशकांच्या साहित्यसेवेनंतर आज ही निर्णायक वेळ आली आहे आणि मी आपल्या पुढे हा असा 'उभा' आहे..

तर .. अर्थात.. एकच मागणे घेऊन

मराठी सारस्वताच्या दरबारात मानाचे पान.. अर्थातच माझे.

कित्येक झाली वर्षे..

मायमराठीच्या सेवेत आहे मी.

कुठून सुरूवात केली.. कॉलेजच्या मराठी पेपरातून.. अहो, दिलेल्या नि वाचून काढलेल्या धड्यातील उत्तरे कुणीही लिहील.. मी आपली नवी उत्तरे बनवू शकायचो. कल्पनेची भरारी घेण्याची सवय तेव्हापासूनची! बी.ए. काय नि एम.ए. काय .. युनिव्हर्सिटीत असलेल्या दुढ्ढाचार्यांना या कल्पनेचे कौतुक किती म्हणाल.. तर शून्य. शून्यभोपळा. तर ते असो.. झाले एवढेच त्याने की प्रत्येक वर्षात दोन दोन वर्षांचा व्यासंग घडवला त्यांनी! व्यासंग घडला खरा पण त्याचा फायदाच झाला! माझ्या साहित्यिक कारकीर्दीचा पायाच घातला त्यांनी.

तर सांगत होतो त्या साहित्यसेवेस सुरुवात केली मी त्या परीक्षा देता देता. कल्पनेच्या भराऱ्या मारायला मी शिकलो ते तिथे.

पुढे तर काय..

तसे तुम्हाला ठाऊकच आहे..

माझी इतकी सारी पुस्तके प्रसिद्ध झाली.. आता आत्मस्तुतीचा थोडा धोका पत्करून सांगतो.. इथे 'प्रसिद्ध'चा अर्थ इंग्रजीतील 'पब्लिश' नसून 'फेमस' हा आहे! खऱ्यास खरे म्हणावेच लागेल ना! आणि खरेतर ही आत्मस्तुती नाही.. वस्तुस्थिती आहे .. त्याला काय करणार?

तर तिथून झाली सुरुवात आणि कित्येक

विषयांवर चालली माझी लेखणी!  बहुप्रसवा म्हणाना! आता माझ्या विरोधात आहेत उभे .. ते म्हणतील .. एक ना धड भाराभार चिंध्या.. म्हणोत बापडे .. पण माझे वाचक साक्षी आहेत. किती विषय .. किती साहित्यप्रकार आणि किती विविधता!

अगदी काव्य संग्रह.. त्यात काही तर काव्य कथा आहेत.. नि कथाकाव्ये.. काव्यनाटके.. कथा संग्रह आहेत.. कथांतही विविध प्रकार.. गंभीर, विनोदी, रहस्य किंवा गूढ.. लघु आणि दीर्घ.. त्यात काही कथाबीज विरहित कथा.. ज्याचा जनक हा जानकीदास आहे. तशाच कादंबऱ्या.. त्यात एक 'ना शेंडा न बुडखा' कादंबऱ्यांचा जनक ही मीच. समीक्षा.. त्यात ही अनाकलनीय समीक्षेच्या भाषेचा जनक मीच.. नाटके .. नाट्यविरहित नाटके.. काही नाटक काव्ये ..चरित्रे नि आत्मचरित्रे .. आणि टीकाग्रंथ.. साहित्याचा एकही प्रकार सोडला नाही अस्पर्शित मी! आत्मचरित्राचा अनेकवचनी उल्लेख वाचून आश्चर्य वाटले असेल पण वस्तुस्थिती अशी .. चरित्रे तर लिहिलीच मी पण कित्येकांनी तर त्यांची आत्मचरित्रे लिहावयास सांगितले मला! आजकाल थोरलोक वाढले आहेत हे मान्यच कराल तुम्ही. त्या थोरामोठ्यांच्या कर्तृत्वातून कोणी बोध घ्यावा म्हणून त्यांची जीवनकहाणी ऐकवावीच लागते.. वर या साहित्यप्रकारास प्रतिष्ठा! तेव्हा माझे नाव दिसणार नाही.. पण ते थोर घडले असतील स्वबळावर .. त्यांची चरित्रे घडली असतील त्यांच्या कर्तृत्वातून पण अशी कित्येक आत्मचरित्रे मी घडवलीत! लिहविता धनी वेगवेगळा एवढेच! आता हे सांगितलेही नसते कदाचित मी , पण थोडक्यात माझ्या लेखणीच्या एकूण ताकदीचा अंदाज यावा इतकेच!

मला आठवतेय.. पहिले पुस्तक आले माझे.. त्याने खळबळ माजवली. बक्कळ प्रति निघाल्या.. माझ्या घरून विरोध.. पुस्तके ठेवायची कोठे म्हणून.. असली खळखळ सांगू.. अजूनही त्या प्रती आहेत.. आठवण म्हणून .. पहिलेपणाची. पहिलटकर मात्र मी खूप दिवस तसा नाही राहिलो.. माझी साहित्यिक कूस नंतर वरचेवर उजवत राहिली. सकस साहित्य प्रसूती हे एकमेव उद्दिष्ट ठेवून मी माझी लेखणी तळपत ठेवली. आजूबाजूच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पुढे जात राहिली लेखणी माझी. प्रतिकूल म्हणालो ना तर खरेच ती तशी .. घरी नि दारी.. परिस्थिती सारखीच!

बहुधा प्रतिकूलतेच्या टाकीचे घाव सोसूनच हे देवपण आले असेल माझ्या साहित्यास. तुम्हाला सांगतो लग्न जमताना माझ्या लेखणीवर फिदा झालेली ही.. आता हिला माझी साहित्यसेवा हा वेळेचा अपव्यय वाटतो. त्यापेक्षा कुठेतरी चार पैसे कमवायचे पहा.. हिचा नेहमीचा करवाद असतो. मोठे मोठे लेखक स्फूर्ती यावी म्हणून काय काय करतात म्हणे..म्हणजे ऐकून आहे मी. काही तर दूर कोठे जाऊन राहतात. काहींना विशिष्ट पेयाची गरज लागते. त्यांच्या घरचे त्यांना डिस्टर्ब न करता त्यांची प्रतिभासाधनाची वेळ कशी जास्तीतजास्त निर्विघ्न राहील हे पाहतात. आमच्याकडे याच्या उलट! बाहेर मारे बोलावतील मोठा सन्मान देऊन. पण स्वघरी ? घरकी मुर्गी चणाडाळ बराबर! आणि काय? हे खरेतर मी सांगू नये. पण का सांगतो आहे? तर साहित्य निर्मितीची तळमळ तुमच्या ध्यानात यावी म्हणून. तेव्हा घरची ही हालत असली तरी माय भाषेच्या सेवेच्या ओढीने मी सकस साहित्यनिर्मिती पासून तसूभरही ढळलो नाही, तेव्हापासून ते आजपर्यंत.

आणि घराहूनही दारी दारूण अवस्था! बी.ए. पास झालो .. एम.ए. राहूनच गेले शेवटी.. पण लेखणीशी संबंधितच नोकरी मिळाली.. ती कारकूनीची.

कचेरीतील या खर्डेघाशीने एखाद्या सामान्यास बिघडवले असते.. मला घडवले. खरेतर मीच न बिघडता घडलो म्हणाना! कचेरीतील कंटाळवाण्या फायलींत मला सामान्य जनांचा आक्रोश दिसायचा. तो मी माझ्या विद्रोही कथा अन कवितांत उतरवण्यास चुकलो नाही कधी. हेडक्लार्कची सही होऊन एखादे प्रपोजल मान्य झाले की एखाद्या प्रियकराला त्याचे प्रपोजल होकारले गेले असावे अशा रम्य कल्पना सुचायच्या मला. टाइपरायटर च्या ट्कट्क आवाजात मला कवितेचा नाद जाणवे. खोटे कशाला सांगू .. माझ्या पत्नीकडून मी समीक्षा शिकलो! म्हणजे कुठल्याही गोष्टीचा किस पाडून त्याच्यावर तुटून कसे पडावे .. हिने मला न विचारता प्रात्यक्षिके

दाखवलीत इतकी वर्षे.. शिकलो त्यातून मी समीक्षा. माझा 'टीका .. टोकाची आणि टोकदार' हा समीक्षा संग्रह उगीच नाही मी तिलाच अर्पण केलाय!

माझी नाटके ही नाट्यपूर्ण झालीत ते प्रत्यक्ष जीवनातल्या नाट्याने. आता जास्त खोलात जात नाही पण माझी पाचही विद्रोही नाटके संपूर्णत: वास्तववादी आहेत.. कितीही कोणास अतिशयोक्त वाटली तरी!

अशा कित्येक गोष्टी सांगाव्यात?

मुद्दा असा की माझ्या साहित्यसेवेत कसलाही खंड पडू दिला नाही मी या सर्व वातावरणात देखील!

एकूण एकूणपन्नास पुस्तके तीही रसिक मान्य आणि प्रसिद्ध. तागडीत तोलल्यास किती होईल वजन! आणि त्यामुळे माझ्या उमेदवारीस नक्कीच वजन प्राप्त होईल.

आता माझे प्रतिस्पर्धी किंवा विरोधक.. त्यांच्याकडे वळू. इथे वळू हे नाम नाही.. क्रियापद आहे एवढे ध्यानात घ्या! माझ्या विरोधात उभे आहेत त्यांची नावे घेत नाही. नावे ठेवण्याची सवय ही नाही मला. गरजही नाही. तुम्ही सारे सूज्ञ आहात. नावे घेतली की नाही घेतली ... तुम्हाला कळेलच कोणाबद्दल बोलतोय मी!

एक ते साहित्यकार .. त्यांची प्रसिद्ध झालेली पुस्तके म्हणजे प्रवासवर्णने! कोणास ठाऊक.. म्हणजे प्रवास केला म्हणून लिहितात ते की लिहायचे म्हणून करतात प्रवास! काही असो .. पण तेच यांचे भागभांडवल! तसा गोवा.. जळगाव.. भुसावळ.. इंदूर .. ते पालघर असा दूर दूर प्रवास केलाय मी देखील पण कुणाला सांगत नाही बसलो की कुणी स्टेशनात कसे फसवले मला किंवा

माझी कशी झाली त्रेधातिरपीट!  प्रवासातल्या अनुभवाच्या कथनातून पाने नाही भरली मी. तशी गरजच काय? म्हणजे जिथे मी माझ्या प्रतिभेचा चरक पूर्ण वेळ फिरवून, एकूणच मंथन करून, सर्व कल्पनाशक्ती व शब्दसंपत्ती माझ्या देवदत्त प्रतिभेच्या रवीने घुसळून साहित्य नवनीत काढत  असेन तर तिथे असल्या उसन्या अनुभवांची जरूरीच काय? आमच्या साहित्याची नुसती वरवर तुलना जरी केलीत ना तर पटेल मी काय म्हणतोय ते.

दुसरे आहेत ते नाट्यसमीक्षक! चुकून नाट्यसंमेलनाचा अर्ज भरण्याऐवजी इकडचा भरला वाटते! म्हणजे झाले होते माझ्या मित्राबाबतीत एकदा.. म्हणजे त्याला करायचे होते बी.कॉम.. पण चुकून बीए चा भरला फॉर्म! कॉलेज एकच होते ना बी.ए. नि बी.कॉम.चे! थोडक्यात अशा चुका करणाऱ्या महोदयांना खरेच तुम्ही निवडणार काय? बाकी जास्त लिहायलाच नको त्यांच्याबद्दल. क्रिकेटमध्ये कसे नोबॉल वर कोणी बाद नाही ना होत तसे हे नोबॉल उमेदवार! यांना आउटसाईड द ऑफ स्टंप बॉल सारखे सोडून दिलेले उत्तम! इथे क्रिकेटचे उदाहरण दिले कारण या प्रस्तुत समीक्षक महाशयांना क्रिकेटची आवड आहे म्हणून! नाहीतर या विदेशी खेळाचे उगाच का उदात्तीकरण करावे मी, नाही का?

अजूनही काही आहेत रिंगणात.

त्यातील एकाना तर तुम्हीच काय मी देखील ओळखत नाही. त्यांनी काही साहित्य सेवा केली आहे हेच मला आजवर ठाऊक नव्हते. तरी देखील त्यांचे स्वागत! त्यानिमित्ताने मातृभाषेत असे ही साहित्यसेवक आहेत याची जाणीव झाली. हे ही नसे थोडके! एकूण आपली ही भाषा किती सर्वसमावेशक आहे याचा अंदाज त्यांच्या उमेदवारीतून यायला हरकत नाही.

एका महाशयांनी अर्ज भरलाय .. ते तो मागे घेणार आहेत अशी खात्रीलायक आतल्या गोटातील बातमी आहे तेव्हा त्याबद्दल बोलून कालापव्यय नको! त्यांना उमेदवारी मागे घेण्यास भाग पाडण्यात आमचा काही हात नाही हे मात्र जाता जाता नमूद करून जावे म्हणतो!

राहता राहिले अजून एक! राजकारणी लोक काहींना अनुल्लेखाने मारतात! तसेच धोरण त्यांच्याबद्दल बाळगलेले बरे!

थोडक्यात तुम्हाला मी काय म्हणतोय नि कोणास मत द्यावे याची कल्पना आलीच असेल! जिथे माझ्या खेरीज अन्य पर्यायही नाही तिथे ही निवडणूक म्हणजे एक उपचारच ठरेल हे सांगावयास कोण्या ज्योतिर्विंदाची गरज नसावी! माझ्या सन्माननीय प्रतिस्पर्ध्यांत एक ज्योतिषीमहोदय स्वत: आहेत आणि त्यांना त्यांच्या स्वत:च्या हरण्याचे भाकित करता येऊ नये! असो! बाकीचे काही असोत किंवा नसोत.. माझे पारडे जड आहे हे तुम्हांलाही मान्य होईल. तेव्हा एखाद्या पुढाऱ्याने म्हणावे तसे म्हणू का.. येऊन येऊन येणार कोण..या लाळघोट्यांशिवाय आहेच कोण!

साहित्यिक आयुष्य गेली पन्नास वर्षे मी जगत आहे. मन लावून वाग्देवीची पूजा करीत आहे. माता सरस्वतीचे आशीर्वाद पाठीशी आहेत. आपला, म्हणजे जनताजनार्दनाचा स्नेह आणि आपुलकी आहे. माझ्या साहित्यिक कारकीर्दीचा परमोच्च क्षण उभा ठाकला आहे.. त्यात तुम्हा मायबाप रसिक वाचकांची साथ हवी आहे.

मी साहित्यविश्वात आजवर यथाशक्ती संचार केला. जमेल तितकी मायमराठीची सेवा केली. साहित्याने मला भरभरून दिले. आनंद दिला. नाव दिले. लौकिक दिला.. प्रतिष्ठा दिली ..

पैसा.. तो ही थोडाफार दिलाच.. मराठी साहित्य विश्वात पैसा? तर हो.. कसा ते सांगतो.. माझ्या साहित्यसेवेचे निव्वळ वजन दहा किलो साडेसातशे ग्रॅम भरले.. माझ्या जुन्या पुस्तकांच्या निव्वळ रद्दीचे वजन ही परवा पंचवीस किलो पाचशेपन्नास ग्रॅम भरले! त्यातून हिने बक्कळ दोनशे सत्तावीस रूपये बारा आणे कमावले. ही खूप खूश झाली. म्हणाली, आता कसं घर रिकामे वाटायला लागले. आजवर हिला इतके खूश कधी पाहिले नव्हते.  सारे काही साहित्याचे देणे आणि काय!

आता फक्त सारस्वतास परत देणे बाकी आहे. भाषेची सेवा आजवर अनौपचारिकरित्या केली. आता एखाद्या माध्यमातूनही ती करावयास मिळावी यासारखे भाग्य ते काय? आपले सर्वांचे लाडके नामदार महसूलमंत्री माननीय श्री. प्रतापरावजी दांडेकरजी माझ्यामागे एखाद्या पर्वताप्रमाणे खंबीरतेने उभे आहेत. तसा मी या निवडणुकीस उभा राहिलोही नसतो पण आमदार साहेबांचा आग्रह पडला.. आणि तुम्हा रसिकांचा आशीर्वाद त्या जोरावर मिळेल याची खात्री आहे मला. इतरही ठिकाणच्या निवडणुकांप्रमाणे विकास हाच एक मुद्दा महत्वाचा आहे. तेव्हा ह्या एकाच मुद्द्यावर मला ही निवडणूक लढवावीशी वाटते. माझ्या मायमराठीचा विकास ह्या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन कार्यरत राहण्याची इच्छा आहे. विच्छा माझी नि ती पुरी करण्यास आपण सारे समर्थ आहात. तेव्हा आगामी निवडणुकीत आपला विभाग पाहू नका.. आपली राजकीय मते बाजूला ठेवा आणि आपले किंमती मत मला देण्यास विसरू नका.. मला हे इथे सांगायलाच हवे की माननीय नामदार प्रतापरावजींचे या निवडणुकीतल्या मतदानाकडे जातीने लक्ष असणार आहे. आणि या सारस्वताचा मर्यादित मतदार गुप्त मतदान करू म्हटले तरी गुप्त किती काळ राहू शकेल? असो. आपण सारे सूज्ञ आहातच. अधिक सांगणे नलगे.

तेव्हा भेटूया परत, साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणाच्या वेळी.

तोवर

जय मराठी..! जय महाराष्ट्र..!

# एका आत्मचरित्राची 'कथा'!

माझे परम मित्र रामभाऊ रामचंद्र रवळकर भेटले रस्त्यात. दोघे आम्ही रिटायर्ड. रामभाऊ रिटायर आयुष्यात चार महिन्यांनी सिनियर मला. मी चाललेलो भाजी आणायला गृहखात्याच्या हुकूमावरून. गंमत बघा ना, कितीही म्हटले गुलामगिरी नष्ट झाली तरी आमच्यासारख्यांची गुलामगिरी कसली संपतेय.. मी निवृत्त झालो काही महिन्यांपूर्वीच. म्हणजे नव्याचे नऊ दिवस सुरू होते माझे. आधी क्लार्क म्हणून बाॅसची हुकूमशाही सहन केली नि ती संपली तर आता घरच्या बाॅसची. सकाळी थोडे पडावे म्हटले तर हुकूम आला, "उठा. लोळत पडू नका. भाजी आणा. नीट पाहून. भेंडी  आणा अर्धा किलो. एक ती सुरीला धार काढून आणा शब्बीरकडून आणि येताना रद्दीवाल्याला सांगा रद्दी घेऊन जायला. तो सुमेरसिंग आहे त्याला. तो पन्नास पैसे जास्त देतो भाव.."

वा! काय व्हरायटी आहे कामांची! भेंडीवाला ते शब्बीर 'धारकर'.. ते सुमेर रद्दी! पन्नास पैसे दर किलो मागे जास्त! वजनात मारत असणार .. मी म्हणणार होतो पण मन:शांती पन्नास पैसे प्रति किलो पेक्षा जास्त महत्त्वाची, नाही का? तेव्हा उगाच वाद नको हे शहाणपण अनुभवातून आलेले, ते वापरत गप्प बसलो. मौनं सर्वार्थ साधत बसलोच.. तर ही म्हणालीच, "बसू नका उगाच, कामं करा काहीतरी.."

"मी काय म्हणतो, अर्धा किलो भेंड्या आणण्याऐवजी भेंड्या खेळूयात आपण? अर्धा तास?"

ह्यावर ज्वालामुखीचा उद्रेक होणार हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नव्हती. तसा तो झाला. आता ही पण एक साईड गंमत .. हिला कित्येक वर्षांपूर्वी माझा विनोदी स्वभाव आवडत असे. हे तिनेच एकदा आपल्या मंगळसूत्राशी खेळत लाजत सांगितलेले .. हो, एक जमाना असा ही होता जेव्हा ती हसतही असे नि लाजतही असे.. दिवस कसे झटकन बदलतात नाही?

तर त्या ज्वालामुखीस तसाच सोडून मग भेंड्या आणायला निघालो मी. तर रामभाऊ भेटले मला. खरेतर रामभाऊ भेटला म्हणायला हवे. पण 'रामभाऊ' वगैरे म्हटले की एकेरीवर येणे कठीण होतं ना म्हणून फक्त आदरार्थी उल्लेख. तर राम, खरेतर राम्या नि मी शाळासोबती. तो हल्लीच म्हणजे सहा महिन्यांआधी मोडीत निघाला नि मी अगदी अलिकडे. मोडीत निघणे हा शब्द त्याचाच ..

"तुला सांगू, रिटायर माणूस म्हणजे अडगळीत पडलेले रेल्वे इंजिन. सगळी वाफ तोंडातून निसटून गेलेली. आता घरी पाय पसरून बसा टोमणे खात. मोडीत काढलेले सामान आपण!"

हा त्याचा माझ्या रिटायरमेंटला खास सल्ला. तसा तो गमत्या आहे नि निराशावादी तर नाहीच. एखाद्या गंभीर माणसाचा सल्ला कसा जास्त गंभीरपणे नाही घेतला तरी चालतो, पण राम्याची गत तशी नव्हती त्यामुळेच त्याचा सल्ला जास्तच गंभीरपणे घ्यायला लागला मला. अर्थात गंभीरपणे तो घेऊन मी करणार काय होतो? नाइलाज को क्या इलाज? फक्त एक मानसिक तयारी आणि काय! भविष्य ठाऊक असले की कसे बरे असते एक तसेच हे.

तर राम्या भेटला रस्त्यात. तो ही चाललेला मंडईत. त्याला परमेश्वराचा प्रथमावतार घ्यायचा होता. मत्स्यावताराचे खास प्रेम त्याला. त्या उलट आम्ही. शुद्ध शाकाहारी. आम्ही बुळबुळीत भेंडी खाणारे.

"काय राम्या कुणीकडे?"

राम्या बाहेर निघाला की मासे आणायला स्पेशल पिशवी घेऊन निघतो. त्यामुळे हा 'आजका अर्जुन' कुणा मत्स्याचा डोळा भेदायला चाललाय हे माहिती असूनही मी विचारले त्याला.

"अरे हेच नेहमीचे. संसार कुणाला चुकलाय? सौ म्हणाली, आणा मासे नि मी निघालो. न निघून सांगतो कुणास? तरी बरेय, आपल्याला थोडीच मासेमारी करायचीय? कोळिणी काय सांगत असतील रे नवऱ्याला.. जा पकडून आण मासा म्हणून?"

"मला कसे माहिती असणार .."

"ते ही खरेच.. नायदर आर यू कोळी नाॅर इज वहिनी कोळीण! तुला काय आॅर्डर वरून?"

"तुला कसे ठाऊक आॅर्डर वगैरे?"

"अरे घरोघरी गॅसच्याच शेगड्या आणि इलेक्ट्रिकचेच फॅन्स! पिशवी घेऊन अशा सकाळी निघालायस म्हणजे वहिनींचा हुकूम असणार.. कदमताल.. एकसाथ, नाही एकदम बाहर निकलके भाजी लायेंगे.. भाजी लाव! खरंय की नाही सांग?"

"एकदम सत्य कथन राम्या. बरे हल्ली काय करतोयस?"

"सांगू? चल त्या देवळात बसून मारूयात गप्पा .. सांगतो नवीन काय ते.."

"हुं.. रिटायर माणूस देवळातच बसायचा .. चल. उगाच भर रस्त्यात अडचण कशाला?"

बाजूलाच देवीचे देऊळ होते. रिटायर झालोय म्हणून बसतोय तिथे हे काही खरे नव्हते पूर्णपणे. आम्ही लहानपणी नि नंतर तरूणपणीही जायचो तिथे. लहानपणी देवळाच्या आवारात खेळायला.. तरूणपणी सणासुदीला नटूनथटून आलेल्यांना बघायला .. माझी वहिनी म्हणजे राम्याची रामी इथेच भेटलेली त्याला. तेव्हा अशा कित्येक संध्याकाळी मी आणि राम्या बसलेलो तिथे .. त्याच देवळातल्या त्याच कट्ट्यावर बसलो आम्ही, देवाचिये द्वारी उभा क्षणभरी म्हणत! फक्त बसण्याचे प्रयोजन बदलले! काळाचा महिमा आणि काय!

आम्ही बसलो..

"बोल नवीन काय ते?"

"मी? अजून काय करतोय विचारतोयस? लिहितोय!"

"काय? हिशेब? तू बॅंकेतला कारकुंड्या. अजून तू लिहून लिहून काय लिहिणार? अकाऊंट्स?"

"हुं. तसे म्हटले तर अकाऊंट्सच. पण आयुष्याचे!

कोणाच्या?"

"माझ्या!"

"तुझ्या? आणि त्याचे हिशेब?"

"हे पहा मला कमी लेखण्याची चूक नको करूस.. माझे आयुष्य अद्‌भुत घटनांनी भरलेले आहे. ते नुसते लिहून काढले तरी सुरस आणि चमत्कारिक वाचायला मिळेल कुणालाही."

"तुझे?"

"अर्थात. थोडक्यात मी आत्मचरित्र लिहितोय."

"तू आणि चरित्र?"

"असे विचारतोयस जणू चारित्र्यावरच संशय असावा तुला! पण मीच लिहितोय आपलेच आत्मचरित्र हल्ली! आपले आपणच लिहावे लागते गड्या.. आत्मचरित्र. काही थोरा मोठ्यांच्या बायकांनी लिहिलियत आत्मचरित्रे आपल्या नवऱ्याचीच चरित्रे वाटावीत अशी. पण आत्मचरित्र

लिहायची फॅशनच आहे.. पुढच्या पिढीसाठी मागे काय सोडून जाणार आपण? तर हेच ना? मार्गदर्शन नको त्यांना?"

"तुझे आयुष्य आणि मार्गदर्शन?"

"अर्थात! मार्गदर्शन! आपले आयुष्य कसे गेले हे आपल्याच हाती असते की नाही?"

"आपल्याच हाती?"

"अर्थातच!"

"पण तुला बरे आठवते सारे तपशीलवार.. लहानपणापासूनचे? मला तर फक्त हेमा ढगे आठवते दुसरीतली नि शाळेबाहेरची चिंचा विकणारी आजी. या जोरावर पूर्ण बालपण काय लिहिणार? तुला अजून काय काय आठवते?"

"मला?"

"अर्थातच तू लिहितोयस म्हणजे तुलाच! की आत्मचरित्र लिहायला लेखक ठेवलायस कुणी?"

"मी काय कुणी थोरामोठ्या पुढाऱ्यांतला वाटतोय.. घोस्ट रायटर ठेवायला? आपले आपणच लिहित जावे.."

"पण जमतं बुवा तुला बरं ते?"

"हुं. जमवावे लागते गड्या."

"म्हणजे?"

"वेडा आहेस तू.. अरे आत्मचरित्र लिहिणे सोपेय.."

"छे! मी काल खाल्लेली भाजी आज आठवत नाही. तर लहानपणी काय केले काय आठवणार?"

"म्हणूनच म्हटले वेडा आहेस! तुला आठवत नाही ना भाजी कुठली खाल्लीस ती?"

"नाहीच.."

"देअर यू आर! मग बाकीच्यांना तरी काय ठाऊक? लिही भेंडी नाहीतर कोबीची!"

"म्हणजे?"

"सोपेय रे! तुझ्या लहानपणीचे डिटेल्स तुलाच नाही आठवत तर दुसऱ्या कुणाला कसे आठवेल? लिही बिनधास्त! अरे आत्मचरित्र म्हणजे आपल्या कल्पना शक्तीला चालना देणे!"

"काय सांगतोस?"

"अरे बघ. तू मला ओळखतोस. तुला माहितीय आपण दोघे एकत्रच मोठे झालोत म्हणून. पण बाकी कुणाला? आता बालकांडात काय लिहावे?"

"जे घडले ते.. आठवेल तसे ..'

"इथेच चुकतोयस गड्या. तसे नाहीच. फक्त एक बेअरिंग घेऊन लिहावे. म्हणजे बघ, आजच्या पिढीला त्यात काही स्फूर्तीदायक वाटायला हवे असेल तर मला लहानपणी खस्ता खाव्याच लागल्या असल्या पाहिजेत. आठवतात ते दिवस.. माधुकरी मागून मग शाळेत अनवाणी जायचो. मास्तरांनी शिक्षा केली एकदा उशीर झाला तर. हातावर छडी. मग त्यांना माधुकरीची गोष्ट कळली. त्यांच्या डोळयांतून घळाघळा अश्रू वाहिले .."

"कधी?"

"कधी काय. लहानपणी माझ्या!"

"छे रे! तू साल्या आळशी आणि खादाड. हां, शाळेत उशिरा यायचास पण या कारणाने नाही!"

"तू असाच वेडा आहेस. अरे लहानपणी खाऊनपिऊन सुखी, वर आळशीपणाने शाळेत उशीर .. यात सांगण्यासारखं काय आहे? आणि तरूणांनी काय शिकावे त्यातून? एका उदात्त उद्देशाने लिहितोय सारे."

"वा! बालकांड अगदी रोमांचकारी आहे तुझे!"

"यस, त्याला मी जास्त रियालिस्टिक भोकांड नाव देणार आहे!"

"वा! छानच."

"नाही म्हणजे अजून वेगळया पद्धतीने लिहिता येईल. म्हणजे आपले शिक्षक जरा खल प्रवृत्तीचे वगैरे. किंवा जन्मतः एखादा आजार किंवा शाळेत असताना गाजवलेला खेळ किंवा एखाद्या नाटकातली गंमत .. वाचणाऱ्यांना कसे वाटायला नको कुणी मोठा आहे म्हणून .."

"खरंय रे."

"सगळे काही स्फूर्ती देण्यासाठी रे!"

"पण तरूणपणीचे काय करशील? म्हणजे बारा भानगडी तुझ्या!"

"फार बोललास! पण हे माझ्या आत्मचरित्राच्या उद्दिष्टावर अवलंबून आहे गड्या! बेस्ट सेलर हवे असल्यास त्या भानगडी नसतील तरी लिहिता येतील. हवी तितकी प्रकरणं. नशीबाने मी लिहिलेले सौ कधीच वाचणार नाही त्यामुळे तसे सेफ आहे. पण स्फूर्तीदायक लिहायचे तर.."

"फारच विचार केलेला दिसतोय राम्या.."

"अर्थातच. त्याशिवाय काय होतेय.. असे लिहावे.. म्हणजे बघ हां, कुणावर सडकून टीका करावी. उदाहरणार्थ तू माझ्यावर कशा कुरघोड्या केल्यास, त्यावर मी कशी मात करत गेलो.. वा मी कित्येकदा कसा फसलो.. वगैरे. मग ते चरित्र प्रसिद्ध झाले की तू मोठमोठे पत्र लिहिशील पेपरात! सारे खोडून काढशील माझा खोडसाळपणा आहे हा सांगत.. आयती तुला नि मला प्रसिद्धी!"

"आहे बुवा छान हे!"

"आहेच मुळी! अरे तुला सांगू मी मॅट्रिकला गणितात नापास झालो पहिल्यांदा!"

"छे रे!"

"अरे ते या पुस्तकात. नि दुसरा प्रयत्न आॅक्टोबरात.. त्यात डायरेक्ट नव्वद गुण!"

"वा!"

"आली की नाही स्फूर्ती तुला ही? अरे लहानपणी मी तलावात बुडता बुडता वाचलो रे. मग पुढे जाऊन शाळेत मी स्विमिंगचे पहिले बक्षीस मिळवले .."

"तू?"

"अर्थातच. आत्मचरित्र माझेय ना? मग मीच. थोडक्यात असा मी असामी होणार आहे. तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार म्हणतात ना .."

"मग?"

"जीवन नाहीतर नाही, आत्मचरित्राचा तरी शिल्पकार होऊच शकतो ना मी?"

"अर्थातच! पण राम्या एक डाऊब्ट आहे!"

"च्यायला! अजूनही बदलला नाहीस तू .."

"का काय झाले?"

"डाऊब्ट काय? डाऊट म्हण. शाळेत पण असाच बोलायचास.. डाऊब्ट! मला डाऊब्ट आहे तू इंग्रजीत फेल बिल तर झाला नव्हतास ना?"

"असलो तरी आॅक्टोबरात नव्वद टक्के मिळाले समज राम्या!"

"हुशार आहेस. फास्ट लर्निंग.."

"मग कुठवर लिहून झालेय चरित्र .. सुरस आणि चमत्कारिक?"

"भोकांड झालेय.. तरूणाईच्या फसफसत्या उत्साहाबद्दल लिहितोय अजून .."

"वा! फसलेला फसफसता उत्साह!"

"फसलेला? जाऊ देत! तुझ्याबद्दल लिहू? पन्नास रूपये पर पेज? अख्खा चाप्टर हवा असेल तर पॅकेज डील .. पाचशे रूपये ..मिनिमम पंधरा पाने शुअर!"

"चाप्टर? चाप्टरच आहेस. तू काय पुलंच्या पोंबुर्प्याचा पंपू होणार आहेस की काय? पण मला सांग तू हे सारे लिहिण्यापेक्षा सरळ कथाच का नाही लिहून टाकत?"

"छे! आत्मचरित्राला कशी प्रतिष्ठा आहे. त्या मानाने कथा हा प्रकार तसा सवंग म्हणावा!"

"वा!"

"आणि आत्मकथन म्हटले की कथन आलेच.. त्यात थोडाफार कथाकथनात्मक मजकूर आलाच."

"छान! शेवटी वेळ चांगला चालला आहे म्हणायचा तुझा राम्या?"

"अर्थातच! पण चल आता निघू. माशाविन सौ म्हणजे पाण्याविना मासा! आता मला फक्त माशाचा डोळाच दिसतोय बघ."

"छान! मला पण भेंड्या दिसताहेत डोळ्यांसमोर.."

"निघूया चल. मला पण असला काही उद्योग शोधायला हवा!"

"शोधच. मी खूश आहे अगदी. वेळ कसा निघून जातो नि चरित्र लिहायचे म्हणजे.. तुला सांगू लिहिताना सृजनाचा आनंद काय हे कळते बघ."

"हुं.. सृजन!"

"अजून सांगतो.. प्रसिद्ध व्यक्ती आत्मचरित्र लिहितात की नाही?"

"हो ना.."

"मग मी ही प्रसिद्ध व्यक्ती आहे.. समर्थ सांगून गेलेत.. लिहिल जो आत्मचरित्र तो ही प्रसिद्ध जाणावा!"

"हो ना! मला काय आठवते सांगू .. लोकसभेत हरले ना की नेते लोक कसे राज्यसभेवर वर्णी लावतात स्वतःची.. तशी बॅक डोअर एंट्री तुझी .. प्रसिद्ध पुरुषा!"

"डोण्ट बी सो जेलस .."

"छे.. तू प्रसिद्ध तर तुझा मित्र म्हणून मी ही प्रसिद्ध!फक्त लहान तोंडी मोठा घास घेतोय.. रामभाऊ वयाने तुम्ही मोठे, तुमचा अधिकार मोठा, तुमची योग्यता मोठी .. आता तर प्रसिद्ध पुरूष होऊ घातलेत तुम्ही! तरीही एक सांगतो.. लहान भावाच्या अधिकारात म्हणा.."

"काय? नाटक नको करूस.. बोल.."

"लिही तू आत्मचरित्र, पण फक्त चुकूनही या पुस्तकातील पात्रे काल्पनिक असून कुणाशी साधर्म्य आढळल्यास योगायोग समजावा असला काही इशारा लिहू नकोस म्हणजे झाले!"

## ऐसा भी होता है.. नाही.. ऐसा ही होता है!

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले म्हणे! म्हणजे आपल्याला उगाच वाकून कुणाची पावले वंदावयास नको म्हणून केलेली सोय असावी ती आणि काय! मोडेन पण वाकणार नाही बाणा आमचा. उगाच इथे तिथे वाकावे की काय आम्ही? त्यामुळे ही अट घालून घेतली आहे आम्ही! कुणी बोले तैसा चालणारा सहजी  मिळायला नको नि आम्हाला वाकून पावले वंदावयास नकोत! थोडक्यात काय आम्ही हुशार आणि हुश्शार आहोत. माणूस आहे तर त्याच्या वागण्या नि  बोलण्यात विसंवाद असायचाच किंवा विसंवादच असावयाचा! उगाच प्रोग्रॅमिंग केल्यासारखे प्रेडिक्टेबल वागायला मानव प्राणी काय यंत्रमानव आहे? अशा यांत्रिक आयुष्यापासून दूर राहणाऱ्या मानवप्राण्याचे त्यामुळे कौतुकच करावयास हवे!

तरीसुद्धा एकदा आम्ही पाहिला असा मानव.. खरेतर महामानव. म्हणजे झाले काय की रस्त्यावरून चाललेलो आम्ही त्यादिवशी. खाली मुंडी घालून. नाही, त्याचा आमच्या स्वभावाशी संबंध नाही. आम्ही अति सालस वा अल्लाघरची गौ असण्याशीही नाही. उगाच कुणाकडे मान वर करून आम्ही बघत नाही असे ही नाही. तर दिवस पावसाळी. पहिल्या पावसाच्या पहिल्या सरी पडून झालेल्या. आणि त्यात रस्त्यावरील खडी उखडून खड्डे पडलेले. पाऊस नुकताच सुरू झाल्याने अजून ते खड्डे ओळखीचे व्हायचे बाकी होते. नाहीतर सरावाने जुने खड्डे टाळता येतात. तर हे नूतन खड्डे अजून नाविन्याच्या नवलाईचे रंग घेऊन साचलेले पाणी पीत बसलेले रस्त्यावर नि ते चुकवत आम्ही निघालेलो. इतक्यात बाजूने संघर्षमय घटना घडताना दिसली. हे ही आम्हाला पडणारे एक कोडे. इतिहासाच्या पुस्तकात ऐतिहासिक व्यक्ती करायच्या ते संघर्ष आणि रस्त्यावर होतात ती साधी भांडणे? असल्या वादावादी.. कलागत.. भांडण.. दंगा.. संघर्ष.. युद्ध वगैरे उतरंडीची चीड आहे आम्हाला. म्हणून आम्ही त्या रस्त्यावरील भांडणांस देखील संघर्षच म्हणतो. असो. मुद्दा फक्त आमची न्यायी वृत्ती समजावी एवढाच आहे. तर दोन व्यक्तींचे संघर्षमय

संभाषण सुरू होते. भांडणाचा अॅजेंडा काही असो. तो आपला मुद्दा नाही. एकाने दुसऱ्यास भडकावले. मग पहिल्याने दुसऱ्यास उचकवले. शब्दातून शब्द वाढले. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे हे समजून दोघेही कृतीवीर प्रत्यक्ष कृतीवर उतरले. त्यात पहिला जास्त कृती प्रवीण. थोबडा फोडेगा तेरा.. राष्ट्राचा मानबिंदू असलेल्या राष्ट्रभाषेत म्हणाला तो आणि दुसऱ्याच क्षणी त्याने तशी कृतीदेखील केली. दुसऱ्याच्या नाकातून रक्त वाहू लागले. आम्ही पाहात होतो सारे. इतक्यात बाकी आम पब्लिक त्या संघर्षात उतरले. त्या गोंधळात पुढे काय झाले ठाऊक नाही पण त्या बोले तैसा थोबाड फोडेवाल्यावर पब्लिकने चवताळून हल्ला चढवला. आम्हाला खरेतर त्याच्या पाया पडायचे होते. पण त्या गोंधळात राहूनच गेले ते. पण हे ही एक आमचे वैशिष्ट्य! मोठमोठी सुभाषिते आम्हास आवडतात. ती आम्ही पाठ करतो. लहानपणी शिकवतो बालमनावर संस्कार म्हणून. पण प्रत्यक्ष जीवनात आम्ही ती शिकवण पाळतोच असे नाही. अर्थात हे फक्त एक निरीक्षण म्हणून. खरेतर ही अपेक्षा चुकीचीच आहे. सुभाषितांचा खरा उपयोग भाषा सौंदर्य वाढवण्यास! असे असताना ती दैनंदिन आयुष्यात उपयोगात आणली तर अनर्थ ओढवणार नाही का? तर बोले तैसा करणाऱ्या त्या इसमाची आम्ही पावले नाही वंदू शकलो हे ही आपल्या जगात वागावे कसे या सामान्य ज्ञानाशी सुसंगतच झाले म्हणावे!

तर सांगायचा मुद्दा.. विसंगती आणि विसंवाद यावर हे विश्व विसंबून आहे! विश्वास ठेवा की नका ठेवू! या विसंगतीला कुणी उगाच हेटाळणीच्या नजरेने पाहते, कुत्सितपणे तर कुणी उपरोधाने. आमच्या माहितीतले एक व्यंगचित्रकार तर अशा गोष्टींवर आपली कावळ्यासारखी नजर ठेवून असतात. जरा कुठे खुट्ट झाले की उचलला कुंचला आणि टेकवला पेपरावर! वर शाब्दिक मल्लिनाथी चुकायची नाही. याउप्पर अनेक स्वतःस विनोदवीर समजणारे लेखक झाले.. विसंगतीस हसतात नि हसवतात ते! कमीतकमी यांची चूल पेटण्यासाठी तरी त्यांना ही विसंगती उपयोगी पडते हेही त्यांना उमजत असेल की नाही कोणास ठाऊक! खरेतर आपल्या लेखणीस विषय पुरवणाऱ्या विसंगतीसच यांनी लक्ष्य करावे याहून दुसरी विसंगती ती कुठली? पण नाही,

यांची धुंदीच मोठी! तर सांगायची गोष्टच ही आहे आम्हाला की आमच्याकडे हे असेच होते.. होत राहाते आणि होत असते. पराडकरांच्या मोरोपंतांच्या जमान्याची गोष्ट वेगळी. त्यांच्या लिहिण्या जगण्यात नि त्या जमान्यातच सुसंगती होती. सुजनवाक्य कानी पडण्याची सोय होती. त्यांनी असे काही सांगणे त्या काळी  सुसंगती साधणारे होते. आता जमाना बदलला. खरेतर बदलणे हाच जमान्याचा धर्म. त्यानुसार बदलला तो. विसंगतीचे दिवस आहेत हे. उजव्या हाताने दिलेले डाव्यास कळू देऊ नये म्हणायचे त्या जुन्या जमान्यात. आता बदलत्या मनूचा संदेश आहे.. तोंडाच्या उजव्या बाजूने बोललेले डाव्या बाजूसही माहिती पडू नये! मग कृतीची तर बातच निराळी! म्हणजे उजव्या आणि डाव्या मेंदूत ही संगती नसलेल्या ह्या जमान्यात विसंगती सदा घडो हेच योग्य न मानणारेच जमान्याशी विसंगत आहेत!

कालचीच गोष्ट. ही बोलायची पद्धत. परवाची किंवा तेरवा .. येरवाची पण असू शकते ही गोष्ट. रस्त्यातून चाललो होतो. तीच मुंडी. तशीच खाली घालून.. पाताळ धुंडत नाही. तर त्याच कारणामुळे. काही नवीन खड्डे जन्मले होते. त्यांच्याकडे निरखून पाहात. नेमेचि पावसाळा येतो. नेमेचि खड्डे घेऊन.. त्या सृष्टीचे कौतुक करत चाललो होतो. तर आजूबाजूला गलका कानावर पडला. एक डोळा खड्ड्यावर नि दुसरा समोरच्या संघर्षमय घटनेवर ठेवत आम्ही उभे राहिलो. एकाच वेळी दोन्हीकडे पाहिल्याने आम्ही तिरळे असल्याचा भास कुणास झाला तर त्याबद्दल आम्हाला दोष नाही देता येणार कुणास. ती करामत त्या रस्त्यातील खड्ड्यांची नव्हे.. खड्ड्यातील रस्त्याची! जाता जाता हे अजून एक.. आम्ही हल्ली खड्ड्यांकडे पाहात नाही चालताना. आमचे गुरू श्री श्री श्री स्वामी आदिगुरू असामान्यानंद म्हणतात, जीवनात फक्त सकारात्मक बाबी पहावयास शिका. म्हणून नकारात्मक खड्डे न पाहता आम्ही त्यांच्यातून वाचलेला सकारात्मक रस्ता पाहात असतो हल्ली. आणि काय सांगावे? आमचे काम खूपच सोपे करून ठेवले आहे स्वामीजींनी. तरी देखील जवळच्या खड्ड्यात गाडले जाऊ नये म्हणून त्याच्यावर लक्ष ठेवत आम्ही बाजूस चाललेल्या घटनेकडे पाहू लागलो. कुणी अतिक्रमण

विभागातले कर्मचारी होते ते. म्हणजे जवळच एक गाडी उभी होती. नि तिच्यावर तशी पाटी होती. आणि त्याच्याच समोर त्याच विभागाचे ऑफिस. यात नवलाई ती काय? पण नाही. खरी गंमत आम्हाला थोड्या खोलवर गेल्यावर कळली. खोलवर म्हणजे खड्ड्यात खोलवर नव्हे.. तर घटनेच्या खोलवर.. चौकशीत.. चांभारचौकशी हा जातीवाचक शब्द नसेल.. तर त्या जातीची चौकशी म्हणा! झाले असे होते की ती गाडी केंद्रीय अतिक्रमण विभागाची आणि हे कार्यालय स्थानिक अतिक्रमण विभागाचे. आणि हे स्थानिक कार्यालयच मुळात अनधिकृत होते म्हणे! आणि त्यांची ती इमारतच अनधिकृतपणे म्हणजे अतिक्रमण करून बांधलेली होती! आम्ही मनोमन खूश झालो. आम्हाला अशा विसंगती दिसल्या की बरे वाटते. कलियुगाचा फेरा आल्यावर त्या युगास न साजेसे वागणाऱ्या नि जगणाऱ्यांबद्दल आम्हाला नेहमीच वाटत आले आहे की असले कालबाह्य लोक या जमान्यास कलंक आहेत आणि ही विसंगती घडवणारे या जमान्याचे किंवा युगाचे शिल्पकार. पुढे तिकडे काय काय झाले कळले नाही. कारण आम्ही शेवटपर्यंत तो शो नाही पाहू शकलो. पण प्रथेप्रमाणेच झाले असणार.. म्हणजे प्रथेप्रमाणे मांडवलीच झाली असणार. कारण दुसऱ्या दिवशी ते कार्यालय तसेच म्हणजे त्याच दिमाखात आणि तिथेच उभे होते. हे पाहून आम्हाला अतीव समाधान झाले. अधिकृत की अनधिकृत.. त्याच रेती सिमेंटातून नि मजुरांच्या घामातून उभ्या राहिलेल्या या बिल्डिंगी. उगाच अन- अधिकृततेच्या विळख्यात त्यांचा बळी द्यावा? मजुरांच्या गाळलेल्या घामाची तरी ठेवावी की नाही किंमत? तर ती इमारत तशीच सहीसलामत पाहून आम्हाला आनंद झालाच. अतिक्रमण विभागच अनधिकृत जागेत असण्याहून काव्यगत न्याय तो कुठला? ही विसंगतीच तर या युगाचे व्यवच्छेदक लक्षण नव्हे का?

असलीच एक घटना घडली आमच्याच कार्यालयात. म्हणजे प्रत्यक्ष घटना तिथे घडली नसेलही पण त्यातील प्रत्यक्षदर्शी आमचाच सहकारी. सहकारी म्हणजे आमच्याशी सहकार्य न करणारा नि फटकून वागणारा. पण कचेरीत एकाच ठिकाणी काम करतो आम्ही म्हटल्यावर त्यास सहकारी म्हणणे आलेच. ते असो. पण आमच्या या सहकाऱ्यास भ्रष्टाचाराची घृणा. म्हणजे तो

असे सांगत असतो.. घृणा शब्द ही त्याचाच.. तर एकदा काही प्रॉपर्टीच्या कामासाठी गेला कुठल्याश्या ऑफिसात. तिकडे फायली काही हलेनात जागच्या. मग कुण्या शिपायाने त्याला फायली हलवण्याचा मंत्र शिकवला. बहुधा याला इतक्यावेळा चकरा मारताना पाहून त्या कोमल ह्रदयी शिपायास चक्कर येऊन पाझर फुटला असावा. या माणसाने म्हणजे माझ्या सहकाऱ्याने काय करावे? शहाणा असता नि या युगाचा धर्म जाणणारा धार्मिक असता तर आपल्याकडच्या काही हिरव्या नोटांना आपल्याकडेच ठेवण्याचा हट्ट न करता. पण नाही.. श्रीमान सत्यवादी निघाले भ्रष्टाचार विरोधी तक्रार नोंदवण्यास. आणि तिकडून ही आला तणतणत.. म्हणाला, त्या अ‍ॅंटी करप्शनच्या ऑफिसात तक्रार नोंदवायची असेल तरी म्हणे हात ओले करावे लागतात! आमचा विश्वास नाही त्याच्यावर. आम्हाला काही वर्षांपूर्वी दिवाळी अंकात असलेच आलेले व्यंगचित्र आठवले. आधी म्हटले ना आम्ही तसे या व्यंगचित्रकारांना असलेच काही वेडेवाकडे दिसत असते. पण आपल्यासारख्या सामान्यांनी त्यात इतके वाहवून जावे? त्या सहकाऱ्याच्या फायलीचे पुढे काय झाले असावे? आम्हाला नाही ठाऊक. पण अगदी नेमके ठाऊक असावयास पाहिजेच का? त्या कागदपत्रांचे काय होईल वा होऊ शकते हे आपल्यासारख्या चाणाक्षांना आम्ही सांगितले पाहिजे असे नाही!

आमचे या विषयातले चिंतन आम्हाला हेच सांगते, एकदा विसंगती हाच आमचा पाया आहे हे मान्य केले ना की पुढचे सारे सोपे होऊन जाते. पाया मजबूत तर वरची इमारत सुदृढ. आम्हाला हेच वाटते.. हे समज आणि उमजण्याचा किमान प्रामाणिकपणा आम्ही दाखवायलाच हवा. पण नाही! आमची एक अजून खासियत आहे. आम्हाला कुणी वाईट बोललेले चालते. कुठे विपरीत घडले.. त्यावर आमच्या पेपरांनी बातमी दिली.. नो प्रॉब्लेम.. पण कुण्या अति उत्साही नाटक सिनेमावाल्याने काही कलाकृती बनवली.. कुणा लेखकाने आपली लेखणी परजून किंवा वापरून काही लिहिले त्यावर.. असे काही घडले की आमच्या दुखावतात भावना पटकन. भावना म्हटले की आम्हाला तर पूर्वीच्या काळी अब्रू नामक एक काचेचे भांडे असायचे.. त्याला तडा गेला

की ते सांधता येत नसे.. असे काही सांगितले जाई त्याची आठवण येते. ह्या भावनाबाई पण अशाच नाजूक आहेत आमच्या. कधी त्यांना तडा जाईल सांगता येत नाही. तर असे काही झाले की आमच्या भावनाबाईंना कुठे कुठे फ्रॅक्चर होते. मग चवताळलेल्या वाघिणीसारखे आम्ही उठून जे दिसेल त्याची मोडतोड करत सुटतो. आमच्या भावनाबाईंच्या अस्मिताताई या थोरल्या भगिनी. त्यांचे रक्षण करण्यास आम्ही सदैव दक्ष असतो. त्यामुळे प्रत्यक्षात कितीही वाईट घटना घडल्या तरी चालते आम्हाला पण त्याच्यावर लिखाण.. कलाकृती.. अब्रह्मण्यम! यावेळी आमच्या अखिल समाजाची एकी बघण्यासारखी असते. आणि निषेध म्हणून आम्ही मूळ घटनेहून भयंकर काही करण्यास मागेपुढे पाहात नाही. आणि का नसावे तसे? विसंगती असणे हा आमचा धर्म आहे. आणि आमचा धार्मिक समाज तो पाळत आहे. आम्हाला तर हे सर्व पाहून भरून येते नि समाधानाचे कढ येतात. मागे आमचा एक मित्र असलेच काही रडगाणे गात बसला होता. त्याला ही समाजाची अधोगती वाटत होती म्हणे! आम्ही त्याला समजावून सांगणार होतो. पण झोपलेल्यास जागे करता येते झोपेचे सोंग घेतलेल्यास कुणी कसे उठवावे? त्याला काय हे सामाजिक वास्तव ठाऊक नसावे? पण काही जणांची ही सवयच असते. उगाच रडतोंडेपणा करत राहणे! तर आम्ही त्याचे ते रडगाणे ऐकून कावून गेलो अगदी. इकडे आम्ही विसंगतीतील संगती पाहून आमच्या समाधानाच्या कढीस ऊत आणत होतो आणि हा विघ्नसंतोषी आमच्या त्या आनंदावर विरजण घालत होता.

आम्ही शेवटी म्हटले.. आता बास! इंग्रजीत यास इनफ इज इनफ म्हणतात.. तसे म्हणालो आम्ही.. अरे बा मित्रा, उगाच ऐसा भी होता है म्हणून रडू आणि कुढू नकोस.. ऐसाभी होता है हे खरे नाही.. खरे तर हेच आहे की ऐसा ही होता है! त्याला किती समजले ठाऊक नाही आम्हाला पण त्याला सांगता सांगता आम्हाला मात्र पुरेपूर उमगले ते! आम्हाला आधी ठाऊक होतेच पण आता हलवून खुंटा बळकट झाला अजून. सत्य हेच आहे.. ऐसा ही होता हे!.

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. नितीन मोरे यांचे हे एकविसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे हे ज्येष्ठ लेखक, आपली यशस्वी श्वसनरोगतज्ञ म्हणून लोकसेवा पार पाडत असतानाच कथा, नाटके, लघुनिबंधही लिहीतात. त्यांच्या खुसखुशीत विनोदी साहित्याचे व नाटकांचे चाहते आता जगभर पसरले आहेत. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत. पण डॉ. नितीनजी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२१ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (५ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (७), डॉ. वृषाली जोशी(१२) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।